शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

वार्षिक अहवाल व ताळेबंद

सन २०२५-२०२६

अनुक्रमणिका

अ. क्र.	तपशील	पृष्ठांक
१	शि. प्र. मंडळीचे हेतू व उदिद्ष्टे	०३-०४
२	शिक्षण प्रसारक मंडळीचे नियामक मंडळ (०१/०४/२०२६ ते २८/०२/२०३१)	०५-०६
३	शिक्षण प्रसारक मंडळीचे विद्यमान प्रशासकीय मंडळ	०७
४	वार्षिक साधारण सभेची सूचना	०८-०९
५	वार्षिक साधारण सभा दि. ०७ डिसेंबर, २०२५ चा वृत्तांत	१०-२६
६	लेखापरिक्षण अहवाल : २०२५-२०२६	२७-५२

*****

Established and Registered in 1888 under Societies Registration act XXI of 1860
Registered under Bombay Public Trusts Act no.50 of 1950
F-86-Pune

AIMS & OBJECTS OF THE S. P. MANDALI

1. To impart popular and reasonably affordable education in India and abroad:
2. To start private schools and considering the needs of the global and Indian Education environment and the NATIONAL EDUCATION POLICY 2020 of Government of India to establish Schools, Colleges, Universities (Vertical, Digital, Online, etc.), Incubation Centers, Start-up Centers, allied Educational Programmes and Projects, Higher Education Cluster, Collaboration, Cluster, Merger, New Department etc. & Section 8 Company if required in India and abroad. Also to establish new institutions, allied Programmes and Projects in India and abroad as per the need of the hour".
3. To take existing ones under its supervision;
4. To encourage Marathi Literature;
5. To found Marathi Instruction on sounder footing;
6. To educate Handicapped, Deaf and Dumb Pupils;
7. To encourage social and scientific research and development activities;
8. To invest any surplus funds of S. P Mandali as per section 11(5) of the Income Tax Act 1961only in modes specified in that section,
9. And to adopt such other measures as might seem desirable for carrying out above mentioned objects

शि. प्र. मंडळीचे हेतू व उदिद्ष्टे

(भाषांतरीत)

१. भारतात व भारताबाहेर लोकप्रिय व सर्वांना परवडणारे शिक्षण देणे.

२. खाजगी शाळा स्थापन करणे आणि भारत सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरुन जागतिक व देशपातळीवर शैक्षणिक दृष्टया गरजेचा विचार करुन भारतात व परदेशात शाळा, महाविद्यालये व विद्यापीठ (Vertical, Digital, Online etc.), Start-up व Incubation Center, Higher Education Cluster, Collaboration, Cluster, Merger आणि नवीन Department इत्यादी आणि आवश्यकतेनुसार सेक्शन ८ कंपनी, अन्य प्रकारच्या संस्था, शैक्षणिक प्रकल्प व उपक्रम सुरु करणे. त्याचप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ता वाढ व विस्ताराच्या दृष्टीने वेळोवेळी गरजेनुसार आवश्यक त्या संस्था, प्रकल्प व उपक्रम भारतात व परदेशात सुरु करणे.

३. अस्तित्वात असतील त्या देखरेखीखाली घेणे.

४. मराठी भाषेला प्रोत्साहन देणे.

५. मराठी शिक्षणाचा पाया दृढ करणे.

६. अपंग, मूक आणि बधिर विद्यार्थ्यांना शिक्षण देणे.

७. वैज्ञानिक व सामाजिक संशोधन व विकासाच्या कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे.

८. शि. प्र. मंडळीकडील वाढीव निधी आयकर कायदा १९६१ - कलम ११ (उपकलम ५) अनुसार गुंतविणे.

९. सदर हेतू सिध्दीस जाण्याकरिता अशाच प्रकारच्या दुस-या इष्ट वाटतील त्या तजविजी करणे.

For all Members of S. P. MANDALI

Members of S. P. Mandali are requested to intimate to the secretary any change in their postal address from time to time.

विनंती

शिक्षण प्रसारक मंडळीच्या सदस्यांनी कृपया आपल्या पत्त्यातील बदल वेळोवेळी मा. चिटणीस, शि. प्र. मंडळी, शारदा सभागृह, स. प. महाविद्यालय आवार, पुणे ४११०३० येथे कळवावा.

(१८६० च्या सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट नंबर २१ प्रमाणे दिनांक १२.०३.१८८८ रोजी नोंदविलेली)
(१९५० च्या बॉम्बे पब्लिक रजिस्ट्रेशन ॲक्ट नंबर २१ प्रमाणे नोंदविलेली एफ-८६ पुणे)

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

(स्थापना दिनांक ०५.०२.१८८८)

✠ अध्यक्ष ✠

मा. ॲड. सदानंद फडके

✠ उपाध्यक्ष ✠

मा. श्री. गजेंद्र पवार

मा. श्री. अनिलकुमार रुईया

मा. श्री. पवनकुमार पोदार

✠ मा. नियामक मंडळाचे अध्यक्ष ✠

मा. सुधीर काळकर

✠ मा. नियामक मंडळाचे उपाध्यक्ष ✠

मा. श्री. राधेशाम अग्रवाल

✠ विश्वस्त ✠

मा. नियामक मंडळाचे सर्व सदस्य

✠ चिटणीस ✠

मा. सौ. रमा समीर कुलकर्णी

शिक्षण प्रसारक मंडळीचे विद्यमान नियामक मंडळ
(दिनांक ०१/०४/२०२६ ते २८/०२/२०३१)

अ. क्र.	**नांव**
१	मा. सुधीर शंकर काळकर, पुणे : अध्यक्ष
२	मा. राधेशाम बंजरगीलाल अग्रवाल, पुणे : उपाध्यक्ष
३	मा. अनिल पुरुषोत्तम बरवे, पुणे
४	मा. पराग शशिकांत ठाकूर, पुणे
५	मा. मनोज पांडूरंग भालेराव, पुणे
६	मा. यशोधन सुनिल भिडे, पुणे
७	मा. नवीन नाइडु, पुणे
८	ॲड. प्रा. डॉ. राघव पंडित अष्टेकर, पुणे
९	मा. तुषार नंदकुमार कुलकर्णी, पुणे
१०	मा. विवेक विठ्ठल नायक, मुंबई
११	मा. सुनील मधुसूदन जोशी, ठाणे (इतर)
१२	मा. सुरेशबाबू पद्मराज मंकणी, सोलापूर
	मा. प्रशासकीय मंडळाचे प्रतिनिधी
१	सौ. रमा समीर कुलकर्णी – चिटणीस, शि. प्र. मंडळी
२	डॉ. महेश अबाळे – अध्यक्ष, प्रशासकीय मंडळ
३	डॉ. अविनाश मोहरील
४	सौ. श्रुती बागेवाडी
५	डॉ. पंकज नातू
६	डॉ. दीपक चव्हाण – चिटणीस, प्रशासकीय मंडळ (पदसिध्द सदस्य)

****

शिक्षण प्रसारक मंडळीचे विद्यमान प्रशासकीय मंडळ

अ. क्र.	नांव
१	श्री. पराग शशिकांत ठाकूर – सदस्य, नियामक मंडळ
२	श्री. नवीन नाइडू – सदस्य, नियामक मंडळ
३	डॉ. महेश लक्ष्मीकांत अबाळे –अध्यक्ष, प्रशासकीय मंडळ व संचालक, प्रिं. एन. जी. नारळकर इन्स्टिटयूट, पुणे
४	सौ. रमा समीर कुलकर्णी – चिटणीस, शि. प्र. मंडळी व मुख्याध्यापिका, एस.पी.एम. इंग्लिश स्कूल, पुणे
५	डॉ. दीपक के. चव्हाण – चिटणीस, प्रशासकीय मंडळ व प्राचार्य, टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे
६	डॉ. अविनाश भास्कर मोहरील – प्राचार्य, स. प. महाविद्यालय, पुणे
७	डॉ. विनिता पिंपळे – प्राचार्य, रा. आ. पोदार महाविद्यालय, मुंबई
८	डॉ. पंकज रमेश नातू – संचालक, प्रिं. ल. ना. वेलिंगकर इन्स्टिटयूट (एम.एम.एस.), मुंबई
९	डॉ. माधवी लोखंडे - संचालक, प्रिं. ल. ना. वेलिंगकर इन्स्टिटयूट, बंगलुरु
१०	डॉ. ओमप्रकाश महादेव अष्टनकर – संचालक, प्रिं. के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिटयूट, सोलापूर
११	डॉ. प्रशांत दुराफे – संचालक, प्रिं. बी. व्ही.
१२	श्री. प्रकाश कांबळे – मुख्याध्यापक, ह. दे. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर
१३	सौ. वर्षा गुमास्ते – मुख्याध्यापिका, नू. म. वि. मुलींची प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे
१४	सौ. श्रुती उल्हास बागेवाडी – मुख्याध्यापिका, कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळा, जुळे सोलापूर
१५	सौ. सविता आनंद बिराजदार – मुख्याध्यापिका, शि. प्र. मंडळीची मराठी माध्यमाची शाळा, निगडी, पुणे.
१६	डॉ. अपर्णा सुनील मॉरिस – मुख्याध्यापिका, एस.पी.एम. पब्लिक इंग्लिश मिडीयम स्कूल, पुणे
१७	सौ. आरती विश्वास खाडिलकर – मुख्याध्यापिका, एस. पी. एम. इंग्लिश मिडीयम स्कूल, परशुराम (चिपळूण)
१८	सौ. अम्रिता कर्नेल – मुख्याध्यापिका, एस. पी. एम. इंग्लिश मिडीयम स्कूल, यमुनानगर, निगडी, पुणे.
१९	सौ. अनुजा कांगणे – मुख्याध्यापिका, नू. म. वि. मराठी शाळा, पुणे
२०	सौ. मनीषा अद्दाम – मुख्याध्यापिका, कै. वा. दि. वैद्य मुलींची प्राथमिक शाळा, पुणे
२१	सौ. सीमा कोरवलीकर – मुख्याध्यापिका, कै. वि. मो. मेहता मराठी माध्यमाची शाळा, जुळे सोलापूर
२२	सौ. दीपा कुलकर्णी – मुख्याध्यापिका, नू. म. वि. शिशुशाळा, पुणे
२३	सौ. जयश्री शशांक एडगांवकर – मुख्याध्यापिका, शि. प्र. मंडळीची मुलींची शिशुशाळा, पुणे
२४	सौ. अर्चना गुरुराज कुलकर्णी – नू. म. वि. शिशुशाळा, सोलापूर
२५	सौ. आकांक्षा आराध्ये – मुख्याध्यापिका, शि. प्र. मंडळीची शिशुशाळा, सोलापूर
२६	सौ. संगीता रविंद्र शिंदे – मुख्याध्यापिका, वि. रा. रुईया मूक-बधिर विद्यालय, पुणे
२७	सौ. लीना वर्तक – मुख्याध्यापिका, एस. पी. एम. इंग्लिश मिडीयम स्कूल, (माध्यमिक), सोलापूर
२८	सौ. संगीता कोळी – मुख्याध्यापिका, एस.पी.एम. इंग्लिश मिडीयम स्कूल, (प्राथमिक व पूर्व-प्राथ.) सोलापूर
	खास निमंत्रित -
१	डॉ. ससिकुमार नारायण मेनन – संचालक, I. A. T. R. I. S. (TDM Lab)
२	डॉ. सुजाता सुवर्णपत्की – प्रभारी प्राचार्या, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, मुंबई
३	सौ. संगीता काळे – प्रभारी मुख्याध्यापिका, नू. म. वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे
४	सौ. स्मिता माळवदकर – प्रभारी मुख्याध्यापिका, नू. म. वि. मराठी शाळा, सोलापूर
५	डॉ. कौस्तुभ धारगळकर – प्रभारी संचालक, प्रिं. ल. ना. वेलिंगकर इन्स्टिटयूट (पी.जी.डी.एम.), मुंबई
६	श्री. सुजित मंगलोरकर , मुख्य कार्यकारी अधिकारी, शि. प्र. मंडळी, पुणे
६	श्री. मंदार उपासनी, रजिस्ट्रार, शि. प्र. मंडळी, पुणे.

शिक्षण प्रसारक मंडळी

वार्षिक साधारण सभेची सूचना

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या संस्थेची सन 2025-26 या वर्षावधीतील वार्षिक साधारण सभा **रविवार दिनांक 13 डिसेंबर, 2026** रोजी दुपारी 4.00 वाजता **लेडी रमाबाई हॉल, स. प. महाविद्यालय आवार, पुणे-30** येथे खालील विषयांचा विचार करून निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी शि. प्र. मंडळीच्या सर्व सभासदांनी या सभेस वेळेत उपस्थित राहावे, ही विनंती.

स्थळ : पुणे
दिनांक : 25/11/2026

सौ. रमा समीर कुलकर्णी
चिटणीस, शिक्षण प्रसारक मंडळी

क्रमणिका

1. शिक्षण प्रसारक मंडळीची मागील वार्षिक साधारण सभा दिनांक 07 डिसेंबर, 2025 ते आज अखेर शि. प्र. मंडळीच्या दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहणे. (हितचिंतक, सर्व मान्यवर, संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर सहकारी)

2. शिक्षण प्रसारक मंडळीच्या दिनांक 07 डिसेंबर, 2025 च्या वार्षिक साधारण सभेचा वृत्तांत कायम करणे.

3. अहवाल काळात संस्थेच्या हितचिंतक, सभासद तसेच संस्थेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी व विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या बहुमानांबद्दल त्यांचे अभिनंदन करणे .

4. मा. नियामक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या सर्व संस्थांचे सन 2025-26 चे वार्षिक अहवाल, मा. लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या हिशेबांची पत्रके या संदर्भातील ठराव संमत करणे (सन 2025-26 चा अहवाल हिशेब पत्रकांसह शि. प्र. मंडळीच्या वेबसाईटवर आहे. (वेबसाईटचा पत्ता : www.spmandali.org.in)

5. मा. नियामक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या सर्व संस्थांचे सन 2026-2027 या वर्षावधीचे हिशेबांचे तपासणीसाठी लेखापरिक्षक म्हणून पुढीलप्रमाणे नव्याने नियुक्ती करण्याचा विचार करणे.

अ. क्र.	लेखापरिक्षकाचे नाव	तपशील
१	मे. डी.आर.बी.एस.व्ही. अँड असोसिएट्स चार्टर्ड अकौंटंट्स, पुणे	शि. प्र. मंडळीचे कार्यालय आणि शि. प्र. मंडळीच्या पुणे, मुंबई, सोलापूर, श्रीक्षेत्र परशुराम आणि चिपळूण येथील सर्व संस्थांचे लेखापरिक्षण आणि शि. प्र. मंडळीच्या सर्व संस्थांच्या हिशेबाचे एकत्रीकरण

6. शि. प्र. मंडळीच्या सभासदांकडून आलेल्या सूचनांचा विचार करणे.

7. संस्थेच्या मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांचा विचार करणे.

08. सभेच्या मा. अध्यक्षांचे मनोगत

09. आभार प्रदर्शन व पसायदान

टीप : शि. प्र. मंडळी घटना नियम क्रमांक 22 नुसार गणसंख्येचे अभावी शि. प्र. मंडळीची 13/12/2026 रोजीची सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब केल्यानंतर अर्ध्या तासाने सभा सुरु करण्यात येईल व सदर सभेस गणसंख्या पूर्तीचे बंधन राहणार नाही.

****

सूचना

1. वरील क्रमणिकेतील विषयांसंबंधी सभासदांना काही सूचना पाठवायच्या असल्यास, त्या त्यांनी शि. प्र. मंडळीच्या कार्यालयाकडे गुरुवार, दिनांक 10 डिसेंबर, 2026 रोजी दुपारी 3.30 वाजेपर्यंत लेखी अथवा shikshanapmandali@spm.education या ई-मेल आयडी वर पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या सूचनांचा विचार करता येणार नाही.

2. शि. प्र. मंडळीच्या सभासदांना वरील क्रमणिकेतील विषयांसंबंधी हवी असणारी माहिती गुरुवार, दिनांक 03 डिसेंबर, 2026 ते बुधवार, दिनांक 09 डिसेंबर, 2026 या कालावधीत शि. प्र. मंडळीचे कार्यालयात सकाळी 11.30 ते दुपारी 3.30 पर्यंत उपलब्ध करून दिली जाईल.

3. तसेच शि. प्र. मंडळीचा लेखापरिक्षण अहवाल, ताळेबंद आपल्या अवलोकनार्थ शि. प्र. मंडळीच्या पुढील संस्थांमध्ये उपरोक्त मुदतीत उपलब्ध राहील-

   1) पुणे : शिक्षण प्रसारक मंडळीचे कार्यालय, स. प. महाविद्यालय आवार, पुणे 411 030.
   2) मुंबई :रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, लखमसी नप्पू रोड, माटुंगा, मुंबई-400 019
   3) सोलापूर : हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, 156-ब, रेल्वे लाईन्स, स्टेशन रोड, डफरीन चौक, सोलापूर 413001.
   4) श्रीक्षेत्र परशुराम : एस. पी. एम. इंग्रजी माध्यमाची शाळा, श्रीक्षेत्र परशुराम, ता. चिपळूण, जि. खेड.

त्यासंदर्भात आपणांस काही शंका असल्यास आपण प्रत्यक्ष शि. प्र. मंडळीचे कार्यालयात येऊन त्यासंबंधीची माहिती घ्यावी अथवा शि. प्र. मंडळीच्या कार्यालयाकडे लेखी अथवा shikshanapmandali@spm.education या ई-मेल आयडी वर गुरुवार, दिनांक 10 डिसेंबर, 2026 रोजी दुपारी 3.30 वाजेपर्यंत कळवावे म्हणजे त्याबाबतचे उत्तर देणे सोयीचे होईल. आयत्या वेळेस माहिती मागितली तर ती देणे शक्य होत नाही, तरी सहकार्य करावे ही विनंती.

4. शि. प्र. मंडळीच्या कार्यालयास प्रत्येक आठवड्यात प्रत्येक रविवारी व इतर सार्वजनिक सर्वमान्य सुट्ट्यांचे दिवशी सुट्टी असते याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती .

सौ. रमा समीर कुलकर्णी
चिटणीस, शि. प्र. मंडळी

सोशल मिडियावर खालील ठिकाणी आपण शि. प्र. मंडळीशी संपर्कात राहू शकता.

1. Facebook : SPMandaliOfficial 2. X (Twitter) : SPMandali
3. Instagram : spmandaliofficial 4. Linkedin : shikshana-prasaraka-mandali

वार्षिक साधारण सभा दिनांक ०७ डिसेंबर, २०२५ चा वृत्तांत

डॉ. राधिका इनामदार, चिटणीस, शिक्षण प्रसारक मंडळी यांनी प्रथम शि. प्र. मंडळीचे अध्यक्ष ॲड. सदानंद फडके, उपाध्यक्ष श्री. गजेंद्र पवार, मा. नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन, उपाध्यक्ष श्री. श्रीकृष्ण चितळे, सर्व नियामक मंडळाचे व प्रशासकीय मंडळाचे सदस्य आणि उपस्थित सभासद यांचे स्वागत केले. सभेची वेळ झाली असल्याने व आवश्यक गणपूर्ती झालेली असल्याने डॉ. राधिका इनामदार यांनी सभा सुरु करण्याची मा. अध्यक्षांना अनुमती मागितली व मा. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेचे कामकाज सुरु केले.

सभेच्या सुरुवातील इनामदार मॅडम यांनी एस. पी. एम. इंग्रजी मध्यमाच्या शाळेतील शिक्षिका सौ. प्रार्थना साठे यांना सरस्वती स्तवन करण्यासाठी मंचावर आमंत्रित केले.

सौ. प्रार्थना साठे यांच्या सरस्वती स्तवनानंतर डॉ. इनामदार मॅडम म्हणाल्या की, अतिशय गोड मधुर अशा स्वरामध्ये सरस्वतीचं स्तवन झालेलं आहे. आपण प्रार्थना साठे यांच्या साठी एकदा जोरदार टाळ्या वाजवू या. खरं म्हणजे सरस्वती

स्तवनानंतर गणेशाचं नाव घेणं हा क्रम थोडासा चुकीचा आहे परंतु मी घेतेय कारण ज्यांचं वर्णन ज्ञानेश्वरी मध्ये 'देवा तू ची गणेशू सकलमती प्रकाशू सकल विद्येचा अधिपती' असा गणपती आज संकष्टी चतुर्थी आहे आणि म्हणून गणपतीचं स्मरण करून आपल्याला सभेची सुरुवात करायला काही हरकत नाहीये आणि म्हणून मी प्रथम गणरायाला वंदन करते आणि मग पुढच्या विषयाकडे वळते.

आपल्या क्रमणिकेवरचा पहिला विषय आहे. गेल्या वर्षी 8 डिसेंबर ला आपली वार्षिक सर्वसाधारण सभा झाली होती आणि आज तोच मार्गशीर्ष महिना फक्त तारीख वेगळी 7 डिसेंबर या वर्षावधीमध्ये आपल्या सभासदांपैकी अनेक ज्येष्ठ सभासद तसंच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक दिग्गज आपल्याला सोडून गेले. त्यांच्या निधनाच वृत्त मंडळीपर्यंत आलेलं आहे. जवळपास आपल्या सभासदांपैकी 80 सभासद आहेत. ज्याचं या वर्षावधीमध्ये निधन झालेलं आहे. सगळ्यांची नावं मी घेत नाही. परंतु काही प्रातिनिधीक स्वरुपामध्ये सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये खूप मोठी कामगिरी केलेले जे दिग्गज आहेत त्यांची इथं नावं घेणं मला आवश्यक वाटतं. आपल्या स. प. महाविद्यालय, जिमखाना विभागाचे माजी क्रीडा संचालक प्राध्यापक निळकंठ गुरव यांचे दीर्घ आजारांनी निधन झालेलं आहे. लेडी रमाबई हॉलचे नूतनीकरण ज्यांनी केले ते भरत शहा यांचंही या काळात निधन झालेलं आहे. त्याचबरोबर ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर, ज्येष्ठ अवकाश शास्त्रज्ञ डॉ. एकनाथ चिटणीस जाहिरात क्षेत्रातील पद्मश्री पियुष पांडे, सिनेसृष्टीतील नामवंत कलाकार धर्मेंद्र, मनोजकुमार, असरानी. सुलक्षणा पंडित आणि ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ गजानन मेहेंदळे अशीही काही सन्माननीय नावं आहेत. मी सर्व सभासदांना विनंती करते की दोन मिनिट आपण उभं राहून त्यांना श्रद्धांजली वाहूया. त्यानंत सर्व सभासद उभे राहिले व मूकपणे श्रध्दांजली वाहिली. ओम शांती शांती शांती: !

या आजच्या सभेला उपस्थित राहू शकत नसल्याचा निरोप आपल्याला लेखी स्वरुपामधे काही सभासदांनी कळवलेला आहे. त्यामध्ये सी.आर. लुनिया, सुरेश एम. तलेरा, श्री चांडक किशोर, डॉ. ससीकुमार मेनन आपले नियामक मंडळ सदस्य श्री सुनील जोशी आणि आपल्या नू. म. वि. प्रशालाचे मुख्याध्यापक श्री. प्रकाश कांबळे यांनी आपल्याला अनुपस्थिती कळवली आहे. त्याची आपण नोंद घेत आहोत.

आता मघाशीच मी गणेशाचं वर्णन केलं आणि गणपती हा विघ्नहर्ता आहे असं संबोधलं याला एक कारण आहे आमच्या नियामक मंडळाचे जे अध्यक्ष आहेत. ॲडव्होकेट एस. के. जैन हे पण गणपतीप्रमाणेच आमच्यावर येणाऱ्या संकटाचं निवारण

करत असतात आणि आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात. त्यांना मी विनंती करते की आज त्यांनी आपलं मनोगत व्यक्त करावं. हा म्हणजे सरांना काही लोणी लावण्याचा प्रकार नाहीये. आबाळे सर फक्त सरांचं खरं कौतुक करण्याची इच्छा कारण ही शेवटची जीबी आहे म्हणून.

ॲड. एस. के. जैन, अध्यक्ष, नियामक मंडळ: शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष माननीय ॲडव्होकेट सदानंदजी फडके, उपाध्यक्ष गजेंद्रजी पवार, नियामक मंडळाचे उपाध्यक्ष श्री चितळेजी, सर्व नियामक मंडळाचे माझे सहकारी, प्रशासकीय मंडळाचे सर्व सभासद, उपस्थित आदरणीय बंधू भगिनींनो खरं म्हणजे मला जे काही सांगायचं आहे ते छापील स्वरूपामध्ये आपल्या सर्वांपर्यंत पोहचवलेलं आहे. तेव्हा पूर्णपणे वाचून आपला वेळ घेण्यापेक्षा काही ठळक गोष्टी मी सांगणार आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये आपण जर पाहिलं तर २०२४-२५ हे साल सुद्धा तेवढा चॅलेजिंग होतं. कारण रोजचे नवे नियम आणि इतर गोष्टी असताना संस्थेने वाटचाल करायची असते. पण त्यापूर्वी २-४ गोष्टी मला आपल्याला सांगाव्याशा वाटतात.

सर परशुराम म्हणजे आपलं एस. पी. कॉलेज, या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून डॉ. अविनाश मोहरील यांची नियुक्ती झालेली आहे. डॉ. अष्टनकर यांची मंगळवेढेकर इन्स्टिटयूटचे डायरेक्टर म्हणून नेमणूक झालेली आहे. डॉ. विनीता पिंपळे रा. आ. पोदार कॉलेजच्या प्रिन्सिपल म्हणून त्यांची नेमणूक झालेली आहे. डॉ. अनुश्री लोकूर यांना महाराष्ट्र शासनाने पुन्हा पुढची ६५ पर्यंतची परवानगी दिलेली आहे आणि रेग्युलर प्रिन्सिपल म्हणूनच त्याही कार्यरत आहेत. डॉ. पंकज नातू यांची मुंबई येथील एल. एन. वेलिंगकर संस्थेच्या एम.एम.एस. विभागाचे डायरेक्टर म्हणून नेमणूक झालेली आहे. आपल्याकडे आतापर्यंत जो फक्त प्रभारी हा जो ओघ होता तो ओघ न राहता सर्व मग नारळकर असेल. बाकी त्या असतील तर रेग्युलर प्रिन्सिपल्स आपण मुख्याध्यापक, प्रिन्सिपल्स डायरेक्टर म्हणतो तशी नेमणूक झालेली आहे आणि सर्व विद्वान आहेत. त्यांचा बॅकग्राऊंड चांगला आहे. यापूर्वी त्यांनी अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. तेव्हा अशी अपेक्षा व्यक्त करतो की त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्व कॉलेज, स्कूल्स आणि संस्थेच्या हितासाठी, संस्थेच्या प्रगतीसाठी काम करतील. याबद्दल मला तरी कुठली शंका नाही त्यांना संस्थेच्या वतीनं शुभेच्छा. आपल्या अचिव्हमेंट म्हटलं तर ते सर्व लिहिलेत. परंतु आजच्या परिस्थितीमध्ये संस्था एज्युकेशनल इन्स्टिट्यूट चालवणं हे एक चॅलेंज झालं आहे. चॅलेंज कशासाठी आहे तर आता परवा मा. पोलीस आयुक्तांनी एक मिटींग घेतली होती आणि त्याच्यामध्ये कॅम्पसमध्ये पाच गोष्टींचं त्यानं म्हटलं होतं. ड्रग फ्री कॅम्पस, वुमेन सेफ्टी कॅम्पस, चिल्ड्रेन्स स्टुडंट सेफ्टी कॅम्पस, सायबर गेमिंग पासून विद्यार्थ्यांना वाचवणारा कॅम्पस असे पाच आयाम घेऊन What we can do आणि खरं पाहिलं तर जशी आपली प्रगती होत चाललीय त्याचप्रमाणे आज ह्या विद्यार्थ्यांना आणि शाळेचा कॅम्पस सुरक्षित ठेवण्यासाठी आपल्याला काय काय करता येईल या गोष्टीचं सर्वांकडून सूचना येतील. आपल्या सर्वांचं त्याच्यात हे प्रॉब्लेम मी म्हणणार नाही. पण चॅलेजेस जरूर आहेत अन कसे आपण हे बघणार आहोत ह्या सर्व गोष्टी आपल्याला बघाव्या लागतील. त्याचबरोबर दुसरी गोष्टी म्हणजे आपल्या ज्या ग्रॅन्टेबल्स शाळा आहेत त्यांच्याबद्दलच्या इन्फ्रास्ट्रक्चरचा प्रॉब्लेम येत असतो आणि आपण पाहिले असेल तर मराठी शाळा आपल्या ज्यात नू. म. वि. की आपलं मानबिंदू आहे. नू. म. वि. मराठी म्हणजे रेग्युलर आपली स्कूल मग मुलींची शाळा बाकीच्या सर्व शाळा म्हणजे आपल्या संकल्पना सुरवात करतानाच त्यांचं ध्येय काय होतं तर मातृभाषेमध्ये उत्तम शिक्षण आपल्या लोकांना द्यावं आणि आपल्याकडे म्हणजे महाराष्ट्रमध्ये मराठीमध्येच तर त्या दृष्टीने आजची परिस्थिती इतकी चॅलेंजिंग आहे की लोकांत एक नेरेटिव्ह आहे की इंग्रजी मिडियम शालेमध्ये शिक्षण घेतल्या शिवाय आपली प्रगती नाही. इंग्रजीचं महत्व कमी न लेखता मराठी मिडियमचं आपला जे आहे. मराठी भाषेमध्ये आपण चांगलंच शिक्षण देऊ शकलो तर निश्चितपणे त्याचा उपयोग समाजाला होईल आणि आता काही दिवसांनी परत लोकांना ही जाणीव होऊ लागली आहेत की मातृभाषेमध्ये शिक्षण दिलं तर निश्चितपणे त्याचा उपयोग प्रोग्रेस फास्ट अंडरस्टँडिंगला होत असतं. म्हणून संस्थेनी ह्या २-३ वर्षांमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर्समध्ये अनेक गोष्टी बदल घडवून आणलेल्या आहेत आणि

तीनही चारही शाळा ज्या आहेत. आपल्या ज्या ग्रँटेबल आहेत पण आपल्याला निधी अभावी बरेच काम रखडले होते. पराग ठाकुरनी नू.म.वि. शाळेमध्ये जे काही बदल घडवून आणलेले आहेत आणि याच वर्षी नू.म.वि. कनिष्ठ महाविद्यालयाचे ५० वर्ष पूर्ण झाल्या बद्दल त्यांना शुभेच्छा देऊ या. दोन दिवसांचा चांगला कार्यक्रमही झाला होता आणि किती अचिव्मेंट्स होत्या, त्या सर्व आणि सर्वांचं पार्टीसिपेशन्स त्याच्यामध्ये होतं. आपण एस.पी. कॉलेजमध्ये Alumni Meet आत्ताच घेतली होती. ज्याच्यामध्ये अनेक आय. एस. ऑफिसर्स, आय. पी. एस. ऑफिसर्स, एमपीएससीचे गव्हर्नमेंटचे सर्व पार्टीसीपेट झाले होते आणि संस्थेमध्ये त्यांची इन्व्हॉल्व्हमेंट कशाप्रकारे करून घेता येईल याबद्दलचं आपण त्या एक दिवसाच्या सेमिनारमध्ये बरीच चर्चा वगैरे झाली होती व इतर अनेक गोष्टींचं आपल्याकडे आलं होतं. एसपीएम पब्लिक स्कूल त्याच्याबद्दल म्हणावं तर जे आपल्याला नेहमी म्हणत असतो की कोचिंग क्लासेसचे चॅलेंज आणि डमी कॉलेज सध्या जो पसरलेले आहे ते रोखण्यासाठी त्यांच्या प्रिन्सिपल जे काही पावलं उचललीत आणि मला आपल्याला सांगायला आनंद वाटतं की ११वी बारावीची पहिलीच ही थोडीफार भीती होती की डमी कॉलेज असल्याशिवाय ज्युनियर कॉलेज किंवा ११वी बारवीचे सेक्शन त्या कॉलेज किंवा शाळेमध्ये होऊ शकणार नाही हे नेरेटिव्ह खोटं आहे हे दाखवून दिलं आहे व त्याच बरोबर JEE-NEET आणि त्याचे फाउंडेशन कोर्सेस हे तेवढंच चांगल्या प्रकारे आपण सुरवात केली होती आणि सक्सेसफुली आपण एका पायदानावर आलो की We have successfully run it. एस. पी. एम. या एस. एस. सी बोर्ड्सच्या शाळेच्या ज्या अचिव्हमेंट आहेत त्या निरनिराळ्या फिल्डस्मध्ये मग सांस्कृतिक, स्पोर्ट्समध्ये आणि अकॅडमिकमध्ये आहेत. त्याच प्रकारे आता जे चॅलेंज आहेत आणि आम्ही आताही बोलत होतो आणि त्यापूर्वी बोलत होतो की मराठी मिडियममध्ये लोकांना नेरेटीव्ह की मराठी मिडियम मधून सुद्धा तुम्हाला चांगलं शिक्षण मिळू शकतं आणि त्याच्यातून तुमची प्रगती होऊ शकते. यासाठी आपण सर्व प्रयत्नशील आहोत आणि निश्चितपणे आपल्याला यश मिळेल याबद्दल कुठल्याही प्रकारचं हे नाही. आताच आपण एस.पी.एम. पब्लिक स्कूल म्हटलं की तिथली नीड पाहता सतीश पवार आणि पाठलाग करून प्रयत्न करून सातवा आणि आठवा मजला असे आणखी दोन मजले बांधण्यासाठी कॉर्पोरेशन कडून प्लॅन पास करून घेतलं आहे. शिक्षण प्रसारक मंडळीचा एस पी कॉलेजचा कॉमर्सची किंवा आपण म्हणू की बेचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स याच्यासाठी नवीन इमारत बांधण्याचं आपण ठरवलेलं आहे आणि त्याचे प्लॅन सुद्धा पास झालेले आहेत. बाकीच्या ज्या चार बिल्डींग आहेत ते आपण पाहतच आहात. ते प्रत्यक्ष स्वरुपात ते आलेल्या आहेत. सोलापुरात, निगडीमध्ये सुद्धा ज्या गोष्टी जरुरी होत्या त्याप्रमाणे आपण करून घेतलेल्या आहेत. तेव्हा इन्फ्रास्ट्रक्चर्समध्ये बुरुजामधल्या जे होस्टील बिल्डींग दर असेल त्याच्या बदली केल्या तर हे सर्व गोष्टी होतांना आपल्याला कुठल्यातरी प्रकारे १,२,३ अशा ज्या संस्था असतात त्यांचा कॉन्ट्रीब्युशन खूप प्रकारे होतं. नावाजलेल्या आपल्या ब्ल्यु चीफ्स आपण म्हणतो किंवा चांगला इन्स्टिट्यूट म्हणतो. ज्यांना भारतामध्ये सुद्धा नावाजलेल्या आहेत जिथं ॲडमिशन साठी क्यु असते जितकी जागा आहे त्याच्या 10 पटीनं आपल्याकडे अर्ज येत असतात तर अशा प्रकारच्या वेलिंगकर स्कूल ऑफ मॅनेजमेंट. एस पी पब्लिक स्कूल, एस पी, एस एस सी स्कूल इतर सर्व गोष्टी मला सांगायला आनंद वाटतो की सोलापूर मधल्या आपल्या मराठी मिडियमची शाळा तिथं सुद्धा वेटिंग लिस्ट असते तेव्हा हे शिक्षण प्रसारक मंडळीचे ज्या चार गुरुवर्य शिक्षकांनी फाउंडेशन ज्या व्हिजनने त्यांनी उभं केलं होतं, कदाचित त्याचंच हे फलश्रुती आहे की जे काही उद्देश असत ते पार पाडण्यासाठी आपलं हे जे मॅनेजिंग कौन्सिल आणि प्रशासकीय मंडळ जे आहेत आणि नियामक मंडळ म्हणजे प्रशासकीय मंडळ जे आहे त्यांच्याकडून सूचना येतात आणि नियामक मंडळ त्यांच्यावर कार्यवाही करतं. तर अशा सर्व लोकांच्या सहकार्याने आपण ज्या गोष्टी करायचं ते करत असतो. आता आपल्या सर्वांना माहिती आहे की मध्ये फ्लड्स आणि ह्याच्या जे काय झालं म्हणून मुख्यमंत्री निधीमध्ये कर्तव्य म्हणून आपण संस्थेच्या वतीनं ₹ 1,00,00,000 ची देणगी मुख्यमंत्र्यांच्या फंडामध्ये दिली होती. त्याच्या नंतर रु. 50,00,000 ची सेवा भारती त्यांच्यामध्ये सुद्धा आपण देणगी दिली होती. तेव्हा शिक्षण प्रसारक

मंडळी सामाजिक दायत्वाच सुद्धा भान ठेवून आहे आणि आपल्या सर्व गोष्टी करताहेत. आपण जर पुढच्या गोष्टी पाहायचं म्हटलं तर एनईपी आपण जे नॅशनल एज्युकेशन पॉलिसी म्हणतो आहे त्याप्रमाणे आपल्या सर्व संस्थेमध्ये म्हणजे शाळा आणि कॉलेजमध्ये कुठल्या प्रकारे कोर्सेस करता येतील? कुठले बदल घडवता येतील ह्या सर्व गोष्टी आपण करतोय. आपल्यात एस.पी. महाविद्यालय, रुईया, पोदार यांना नॅकचा सर्वोत्तम दर्जा मिळाला असल्यानं स्वयतता मिळाली असून त्याप्रमाणे ते आपापल्या कोर्सेस चालू करताहेत. एस.पी. कॉलेजमध्ये आपण बी. ए . इन सिव्हिल सर्विसेस हा नवीन कोर्स सुरु केला आणि त्याचं हे दुसरं वर्ष आहे. पण आपल्याला प्रवेश वगैरे इतके मिळाले आहे की आणि मला वाटतं की म्हणजे बीए सिव्हिल सर्विस हे शिक्षण देणारे हे पहिले कॉलेज आहे पुणे युनिव्हर्सिटी मध्ये. अन त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. रुईया कॉलेजने या वर्षी स्पीक फॉर इंडिया महाराष्ट्र ऍडीशन्स याच्या वतीनं एक कार्यक्रम हाती घेतला होता ज्याच्या मध्ये लष्करी अधिकारी लेफ्टनंट जनरल डी एस कुशवा व इतर आयस अधिकारी व सर्वांनी भाग घेतला होता आणि निश्चितपणे त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना होईल त्याबद्दल वादविवाद स्पर्धाही झाली होती. रूईया आणि पोदारच्या दोन गोष्टी आपल्याला म्हणाव्या लागतील की दरवर्षी सांस्कृतिक आणि नाटक ह्याच्या मध्ये मुंबई युनिव्हर्सिटीमध्ये सर्वात टॉपमध्ये असतात आणि ह्या गोष्टी आपल्याला त्याच बरोबर मुंबई युनिव्हर्सिटीमध्ये मुंबई विद्यापीठामध्ये ह्या दोन्ही कॉलेजला ज्या ऍडमिशनसाठी अर्ज असतात त्या सर्वात जास्त असतात. ह्या गोष्टी सुद्धा आपल्याला विचार करण्यासारख्या आहेत. अनेक बक्षिसं अनेक प्रकारचे आपल्याला प्रत्येक कॉलेजला प्रत्येक संस्थेला मिळाले आहेत आणि त्याच्या सर्वांचं वर्णन आज तरी इथं करणं जरा अवघड आहे. परंतू ज्या गोष्टींचा आपल्याला उल्लेख करावा लागेल ते सिपला त्या डॉक्टर इसुम अहमद आणि हमीद अहमद यांनी खूप मोठी देणगी म्हणजे आपल्या केमिस्ट्री डिपार्टमेंटमध्ये नूतनीकरणासाठी दिली. त्याच्यानंतर त्यांनी इन्स्ट्रुमेंट्स वगैरे घेण्यासाठी सुद्धा आणि मला सांगायला आनंद वाटतं की ह्या सर्व गोष्टींचं त्या त्या प्रिन्सिपलनी आणि तिथल्या त्या लोकांनीच प्रयत्न करून आपल्याला ह्या सर्व गोष्टी मिळवून दिल्यात. पोद्दार कॉलेजचं व्हीआयटी बरोबर त्यांनी इंटर आपलं डायव्हर्सिटी आणि बाकीच्या गोष्टीचं म्हणजे इंटरडिसिप्लिनचं करार केल्यानंतर आपले प्रोफेसर्स त्यांना इकॉनॉमिक्स अकाऊंटंसी वगैरे शिकवतील आणि त्यांचे प्रोफेसर आपल्याला मशीन लर्निंग आणि इतर गोष्टी शिकवतील. म्हणजे जेणे करून नवीन अभ्यासक धोरण हा नॅशनल एज्युकेशन पॉलिसी त्याचा फायदा आपल्या कॉलेजच्या सर्व विद्यार्थ्यांना मिळण्याचा मार्गवर आपण आहोत त्याबद्दल कुठल्याही प्रकारचं हे राहणार नाही. नवीन नवीन उपक्रम नवीन कॉलेजेस इंडस्ट्रीजला लागणारे कोर्सेस असे आपले सर्व कॉलेज आणि शाळा व्यवस्थितपणे इम्प्लमेंट करत आहेत. काही अचीव्हमेंट्स जे आहेत ते निश्चितपणे आपल्या सर्वांना सांगायला हवं. जरी ह्याच्यामध्ये लिहिलं असलं तरी आणि त्यातला एक म्हणजे मुंबईतील आपली जी नामांकित संस्था जी इन्स्टिट्यूट फॉर ऍडव्हान्स ट्रेनिंग अँड रिसर्च इन इंटरन डिस्सिप्लिनरी सायन्स त्याचे संचालक आहे. शशिकुमार मेनन, चीफ सायंटिस्ट डॉक्टर मुकुंद चोरघडे यांच्या समवेत आपल्या नियामक मंडळाचे सदस्य राजेंद्र पटवर्धन हे अमेरिकेला गेले होते अन् तेव्हा तेथील University of Illinois, Urbana Champaign, Illinois, Molecule Maker Lab Institute (MMLI), Prinston University, LTIMindtree, New Jersy, Rutgers University येथे भेट देऊन तिथं कार्यरत असलेल्या विविध विषयातील तज्ञ नामांकित शास्त्रज्ञांशी संवाद साधला. Prof. Martin Burke who is scientific founder of four biotechnology companies with five drug candidates that have entered clinical trials and also associated with the Molecule Maker Lab Institute (MMLI), Mr. Vitold Glinski is a Chemical Engineer by training and currently is the President of the company, that his father founded namely, Planta Analytica, Nobel Prize winner Sir Richard Roberts, Ms. Pam Randhawa [CEO and Founder of Empiriko] MMLI चे Prof. Martin Burke हे आपल्या लॅबमधील डॉ. मेनन व डॉ. गायकवाड यांना assembly and use of robotics in molecule synthesis

बाबत प्रशिक्षित करण्यास तयार झाले आहेत. त्याचबरोबर he is ready to transfer the assembled robot to our laboratory in India. ज्याची किंमत काही कोटमध्ये जाऊ शकतात. अन ही अपर्चुनिटी आपल्या विद्यार्थ्यांना निश्चितपणे फायद्याची होणार आहे. तर अशा प्रकारे आपल्याला आपली कुठली संस्था असूदे त्यांच्याबद्दल ज्या पद्धती नसेल ते होत असतं. वेलिंगकर इन्स्टिट्यूटचं परवाच म्हणजे मागच्या वर्षी हॅकथॉन जे झालं त्या वेळेला आपले पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदीजींनी भारतामधल्या पाच इन्स्टिट्यूटना त्यांनी संबोधित केलं होतं अन् वेलिंगकर इन्स्टिट्यूट वॉज वन ऑफ इट हे निश्चितपणे आपल्याला वाखाणण्यासारखी गोष्ट आहे. त्याबरोबरच त्यांनी इतर गोष्टीचं आपण जे म्हणतं होतं तर एक मोठं आपण सेमिनार आयोजित केलं होतं आणि त्यामध्ये दक्षिण आशियातील शिक्षणतज्ञ, संशोधक, मान्यता अधिकारी आणि विद्यार्थी असे मिळून एकूण २५० पेक्षा अधिक जणांनी सहभाग नोंदवला होता आणि त्याच उद्घाटन भारताचे माजी सरन्यायाधीश डॉ. डी. वाय. चंद्रचूड यांच्या हस्ते झालं होतं आणि प्रमुख अतिथी म्हणून अभिनेते, दिग्दर्शक बोमन इरानी होते. जेफरी एल्डरमन अध्यक्ष आणि सीईओ ACBSP, डॉक्टर उतरा ओक अध्यक्ष ACBSP रिजन १० हे सुद्धा समारोपाला उपस्थित होते. आपल्याकडे वेलिंगकर इन्स्टिट्यूटनी टेम्पल ट्रस्ट मॅनेजमेंटसाठी मोठा एक कार्यक्रम हाती घेतला आहे.

या सर्व गोष्टी करतांना वेलिंगकरचे ग्रुप डायरेक्टर आपण जे म्हणतो डॉक्टर साळुंके त्यांनी त्यांच्या अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कमिटी असोसिएशन्स यांच्यावर त्यांची निवड झाली आहे आणि एकच सांगायचं म्हटलं तर डॉक्टर साळुंके यांची एसीबीएसपी रिजन त्यांची जे ॲन्युअल कॉन्फरन्स येत त्यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे आणि दक्षिण आशियाचे प्रतिनिधी करणारे ऑक्रेडेशन कौन्सिल फॉर बिझनेस स्कूल आणि प्रोग्रामचे अध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक झालेली आहे. तेव्हा आपल्या इन्स्टिट्यूटमधे कुठे काय नाही असं म्हणण्यात हरकत नाही. पुण्यातील आपली प्रिन्सिपल बी. व्ही. भिडे फाउंडेशन्स या संस्थेत सुद्धा विविध प्रश्नांवर संशोधन प्रकल्प सुरू असतात. तिथं आपल्याकडे सायंटिस्ट जे आहेत हे सर्व कार्यरत आहेत आणि ह्या सर्वांना या प्रिन्सिपल बी. व्ही. भिडे फाउंडेशन्सच्या माध्यमातून आपण आता मधुमेह डायबिटीस या डायबिटीसवर सध्या बाजारात अनेक आयुर्वेदिक उत्पादनं उपलब्ध तर आहेत, परंतु त्यातील प्रत्येक घटकांची पुरेशी शास्त्रीय मिमांसा झालेली नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर अजूनही भारतीय उत्पादनात मान्यता मिळू शकली नाही. यासाठी राजीव गांधी विज्ञान फाउंडेशन आणि तंत्रज्ञान आयोग यांच्या माध्यमातून इन्स्टिट्यूशन ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई या संस्थेबरोबर आपण त्या प्रोजेक्टवर काम करण्यासाठी भिडे फाऊंडेशनची नेमणूक झाली आहे आणि त्यांच्याबरोबर मेमोरांडम ऑफ अंडरस्टँडिंग हा करार सुद्धा आपला झालेला आहे. आपल्याला या प्रकल्पासाठी आणि इतर गोष्टींसाठी भिडे फाऊंडेशन ला रु. 50,00,000 ची उपकरणं आपल्याला मिळणार आहेत. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील आठ संशोधन संस्थांची या कामासाठी निवड करण्यात आली आहे आणि त्यापैकी पुण्यातील भिडे फाऊंडेशनची निवड झाली आहे ही अभिमानाची बाब आहे. आपल्याला सांगायचं तर सोलापूरच्या नू.म.वि. मराठी शाळेची माझी सुंदर शाळा याच्यामध्ये त्यांना तृतीय स्थान मिळालंय. एसपीएम पब्लिक स्कूलचे जर्मनीच्या विद्यार्थ्यांचं बरोबर ॲक्सेंज प्रोग्राम झाला आणि शाळेचे १२ विद्यार्थी व दोन शिक्षिका हे स्टुडंट ॲक्सेंज प्रोग्राममध्ये जर्मनीला जाऊन आले तर त्यांचे विद्यार्थी आपल्याकडे आलेत आणि अशा प्रकारे आपण इंटरनॅशनल एक्सपोजर आपल्या विद्यार्थ्यांना द्यावं याच्यासाठी आपले प्रयत्न चालू आहेत. आपल्या प्रत्येक शालेला मग नाटक असेल स्पोर्टस असेल इतर असेल. प्रत्येकमध्ये आपण पार्टीसिपेट करतो अन सर्वांनी चांगलं यश संपादन केलेलं आहे. खरं पाहिलं तर इतर असल्यानं आपल्याकडे वि रा रुईया मूक बधिर विद्यालयं ही शाळा कुठे कमी नाही. जागतिक दिव्यांगाच्या दिनाच्या निमित्तानं बालकल्याण संस्था येथे आयोजित केलेल्या आनंद मेळाव्यात आपल्या शालेच्या विद्यार्थ्यांनी विष्णूचा वराह अवतार केंद्रस्थाने ठेवून दशावतार व नवरसाची अनुभूती देणारी विष्णुवंदना सादर केली होती अन त्याबद्दल सर्वांनी त्यांचा उल्लेख केला होता. के पी मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट आता सप्टेंबर २०२५ ला म्हणजे आपले नवीन डायरेक्टर अष्टनकर आल्यानंतर सायबर गुन्ह्याच्या तपासतंत्र

व आव्हानं या विषयावर सोलापूर पोलीस विभागातील सायबर गुन्हे शाखा २६ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. आपण प्रशिक्षण दिलं. दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. निबंध आपलं मार्गदर्शनाखाली नामवंत व्यक्तीच्या ३१ शोध निबंधात आपण सादर केलेल्या व इतर सर्व प्रकारच्या ॲक्टिव्हिटीज आपल्याकडे ह्या स्वरुपात चालत आहे. ह्याच बरोबर आपल्याला सांगायचं तर वेलिंगकर इन्स्टिट्यूटच्या आताच्या ह्याच्यामध्ये आपल्याला जर काही गोष्टींचा काही आणखी थोडासा उल्लेख करावा म्हटलं तर तिथल्या एक विद्यार्थ्याला स्टार्टिंगला 40,00,000 रुपयेचं पॅकेज मिळालं आणि ओन ऑन एव्हरेज 11.28 लाख म्हणजे 840 विद्यार्थी आहेत. प्लेसमेंटचा रेकॉर्ड पाहता ₹11.28,00,000 ओन ऑन एव्हरेज विद्यार्थ्यांना मिळतायत ह्याची आपल्याला जे काही क्रेडीट द्यायचे असेल तर तिथली फॅकल्टी तिथली प्लेसमेंट टीम आणि विद्यार्थी ह्या सर्वांना एकत्रितपणे द्यावं लागेल. मात्र एक गोष्ट सांगावी लागेल की इथून पुढचा काळ जो आहे हे ट्रॅडिशनल एज्युकेशन्स ह्याच्यामध्ये आमूलाग्र बदल करण्याची गरज आहे. मग ते एआयच्या असतील. डिजिटलच्या असतील मशिन लर्निंग किंवा नवीन काय पाहिजे असतील - इंडस्ट्री ओरिएंटेड आणि इंटरनॅशनल वर्ल्डमध्ये रिक्वायरमेंट कशा प्रकारची असेल तर ह्या सर्व चॅलेंजेस आपला वेलिंगकर इन्स्टिट्यूट त्यानंतर नारळकर इन्स्टिट्यूट आणि मंगळवेढकर इन्स्टिट्यूट या तिनही चॅलेंज ऑल ॲक्सेपट करतील असं मला वाटतं. आपल्याकडे सांगण्यासारखं खूप आहेत. परंतु त्याला काही मर्यादा आहेत. लिमीट्स आहेत, अचिव्हमेंट खूप आहे. त्यालाही लिमीट्स आहेत तर मर्यादा आहेत. काही जणांची नावं घ्यायची राहून गेली असतील. कारण आपल्या प्रत्येक स्कूलच्या हेड जो आहे हे सर्वजण आपापल्या प्रकारे त्यांच्या अचिव्हमेंट आहेत. त्याचं कारण जर म्हटलं तर ह्या सर्वचं क्रेडिट माझे जे सर्व सहकारी नियामक मंडळाचे सदस्य आणि आपल्या अध्यक्षांचं मार्गदर्शन या सर्वांना जातं कारण त्यांच्या सर्व सहकाऱ्यानेच आपण ह्या सर्व गोष्टी घडून आणू शकतो. आपण एकटे कोणी काही करू शकत नाही अन त्याच बरोबर आपल्या सर्व सदस्यांचं आपल्या सूचना असतात अन् आपला पाठिंबा असतो. इम्प्लॉईड असतो आणि डायरेक्ट असतो. चांगल्या गोष्टी करु देणं नियामक मंडळाला हे सुद्धा आपलं क्रेडिट आहे आणि म्हणून आपण सर्वांनी जे विश्वास दाखवून या 10 वर्षामध्ये पाच वर्षामध्ये आपण जे काही काम करायला हव होत त्या मार्गस्थ आहोत. आपण काम करत आहोत. संस्थेचं नावलौकिक वाढवण्यासाठी संस्थेच्या ज्या हेतुनी स्थापना झाली त्या दिशेनं चालण्यासाठी आपण काम करीत आहोत याबद्दल मला माझ्या नियामक मंडळाच्यावतीने आपल्या सर्वांना धन्यवाद देऊन माझं बोलण इथच संपवतो. जय हिंद जय महाराष्ट्र!

डॉ. राधिका इनामदार : आता क्रमणिकेवरील विषय क्रमांक दोन वरती आपण येऊया. विषय क्रमांक दोन आहे, दिनांक ०८.१२.२०२४ च्या वार्षिक साधारण सभेचा वृत्तांत कायम करणे.

श्री. सतीश पवार : हॅलो, मी सतीश पवार असे सुचवत आहे की शिक्षण प्रसारण मंडळीच्या दिनांक ८ डिसेंबर २०२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत कायम करण्यात यावा.

श्री. राजेंद्र पटवर्धन : मी राजेंद्र पटवर्धन त्यास अनुमोदन देत.

ॲड. सदानंद फडके : आपल्या सर्वांसमोर हा ठराव संमतीसाठी ठेवण्यात आला आहे. या ठरावाला कोणाचा विरोध असेल तर त्यांनी हात वर करावा. कोणाचाही हात वर न आल्यामुळे मी असं समजतो की सर्वांनी या ठरावाला संमती दिली आहे. ठराव सर्वानुमते मंजूर.

डॉ. राधिका इनामदार : विषय क्रमांक तीन आहे. अहवाल काळात संस्थेच्या हितचिंतक सभासद तसंच संस्थेच्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी आणि विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या बहुमानाबद्दल त्यांचं अभिनंदन करणं. सर्वच गोष्टी मी इथे वाचत नाही. कारण आता माननीय अध्यक्ष जैन सर यांच्या भाषणातून त्यांनी आमच्या सर्व महाविद्यालयातल्या सर्व घटकांनी जी प्रगती केलेली आहे किंवा जी लक्षवेधी घोडदौड केलेली आहे, त्याचा संपूर्ण सात्यंत वृत्तांत दिलेला आहे

आणि आपल्याकडे जी टाइप कॉपी सरांच्या भाषणाची दिलेली आहे, त्याच्यातही हे सर्व उल्लेख आहेत. त्यामुळे सभेचा अधिक वेळ न घेता मी असं आपल्याला विनंती करते.

या सर्व संस्थांच्या अभिनंदनासाठी आपण ठराव करुया आणि त्यासाठी त्यांच्यासाठी आपण जोरदार टाळ्या वाजवू या.

ॲड. सदानंद फडके : हा ठराव आपल्यासमोर ठेवण्यात आलेला आहे. या ठरावाला कोणाचा विरोध असल्यास त्यांनी कृपया आपला हात वर करावा. कोणाचाही विरोध दर्शवणारा हात वर न आल्यामुळे हा ठराव सर्वानुमते मंजूर.

डॉ. राधिका इनामदार : धन्यवाद सर, याच भागामध्ये एक गोष्ट आज आपण वेगळी करणार आहोत. माननीय शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष फडके सर यांच्या पूर्व परवानगीनी आपल्याला ठाऊक आहे की पुणे, मुंबई, चिपळूण, सोलापुर सगळीकडे आपल्या शि प्र मंडळीच्या संस्था आहेत. विशेषतः सोलापूर मधील संस्थांनी आत्ता या पाच वर्षांमधे जी काही प्रगती केलेली आहे आणि जे सहकार्य शि प्र मंडळीकडून त्यांना मिळालेलं आहे त्याबद्दल सोलापूरचे आपले आजीव सदस्य डॉ. सतीश वळसंगकर सर हे नियामक मंडळाचे अध्यक्ष आणि आपल्या शि. प्र. मंडळीचे अध्यक्ष या दोघांचाही सत्कार करू इच्छितात. तत्पूर्वी त्यांनी जे पत्र पाठवलं होत त्या पत्रातला काही मजकूर मी आपल्याला वाचून दाखवते म्हणजे आपल्याला त्याची स्पष्ट कल्पना येईल.

शि. प्र. मंडळीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेची उन्नती व्हावी यासाठी काही ना काही विषय मी मांडत असतो, हे वळसंगकर सरांचं पत्र आहे. यावेळी मात्र संस्थेचं आणि कार्यकारी मंडळाचं अभिनंदन आणि कौतुक करण्यासाठी मी उभा आहे. संस्थेने सोलापूरच्या कामात गंभीरपणे लक्ष घातलेलं आहे.

ह. दे प्रशाला, नू.म.वि., इंग्रजी माध्यमाची पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक आणि जुनियर कॉलेज तसेच मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट या संस्थांचे काम उत्तम चालू आहे. सोलापूरमध्ये जवळ जवळ २५० ते ३०० कॉटस्चे रुग्णालय चालू होते, परंतु विविध कारणांनी ते बंद पडले होते. परंतु नवीन संचालक मंडळाने एक वर्षापासून उत्साहाने या रुग्णालयाचे पुनरुज्जीवन करण्याचे ठरवले. त्यानुसार विविध स्तरावर प्रयत्न सुरु केले आणि आता रुग्णालयाचा बाह्य रुग्ण विभाग चांगल्या रितीन चालू आहे 100 कॉट्सचे हे रुग्णालय होईल, असा प्राथमिक अंदाज आहे. रुग्णालय उत्तम चालण्यासाठी नर्सिंग सेवा उत्तम असावी लागते त्यासाठी नर्सेसचे ट्रेनिंग सेंटर चांगले असावे लागते शिप्र मंडळीने या रुग्णालयाचे नर्सिंग कॉलेज काढण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर मदत केलेली आहे. या सर्व मंडळींनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे कौतुक आणि आभार मानण्यासाठी मी इथे उभा आहे आणि कौतुक करायला शब्द कमी पडतील म्हणून प्रातिनिधिक स्वरुपात मी त्यांचे आभार मानतो.

सर मी आपल्याला विनंती करते, आपण मंचावरती यावे.

यानंतर डॉ. सतीश वळसंगकर यांनी मा. अध्यक्ष ॲड. सदानंद फडके व नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

ॲड. सदानंद फडके : डॉक्टर वळसंगकर हे अनेक वर्षे आपल्या संस्थेच्या कामामध्ये लक्ष घालत असतात. सोलापूरला त्यांची उत्कृष्ट वैद्यकीय प्रॅक्टीस होती. परंतु आता ते पुणेकर झालेले आहेत म्हणून आपण त्यांचं पुणेकरांच्या वतीने स्वागत करुया.

डॉ. राधिका इनामदार : धन्यवाद ! आपल्यासारख्या सदस्यांच्या प्रेरणेमुळेच आम्हाला काम करायची प्रेरणा मिळते. सर पुन्हा एकदा आपले आभार आणखीन एक विषय इथे मला मांडायचं आहे. आपल्या नुमवीत पूर्वी शिक्षक असलेले आणि आपले आजीव सदस्य असलेले फगरे सर यांनी आपल्या शि. प्र. मंडळीला ₹1,00,000 ची देणगी दिलेली आहे, एनडाऊमेंट प्राईझेस जी आपण ठेवतो त्याच्यासाठी. आणि ती खास हिंदी विषय शिक्षकांसाठी दिलेली आहे. त्यामुळे सर्व शाळा, महाविद्यालयांना मी असं सांगेन की आपण तयारीत रहा. आपल्याकडच्या उत्तम हिंदी शिक्षकांना प्रेरणा

द्या आणि हे बक्षीस मिळविण्यासाठी उद्युक्त करा. धन्यवाद. आपण फगरे सरांचेही आभार मानूया मला वाटत आज ते इथं उपस्थित नाहीयेत.

यानंतर पुढील विषय म्हणजे विषय क्रमांक चार - सन २०२४-२०२५ चे वार्षिक अहवाल माननीय लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या आहेत. हिशोबांची पत्रके याबाबतीतील ठराव संमत करणे.

राजेश पटवर्धन : मी राजेश पटवर्धन असे सुचवित आहे की मा नियामक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या सर्व संस्थांचे सन 2024-25 चे वार्षिक अहवाल माननीय लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या हिशोबाची पत्रके यासंदर्भातील ठराव संमत करणे, लेखापरीक्षण अहवाल संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

केशव वझे : मी, केशव वझे यास अनुमोदन देत आहे.

ॲड. सदानंद फडके : आपल्या सर्व सदस्यांना हे हिशोब वेबसाईटवर उपलब्ध आहे. सर्वांनी ते बघितले आहेत असं आपण गृहित धरतोय. या पार्श्वभूमीवर हे हिशोब मंजूर करण्याचा जो ठराव आहे त्याला कोणाचा विरोध असल्यास त्यांनी कृपया आपला हात वर करावा. कोणाचाही हात वर न आल्यामुळे हा ठराव सर्वानुमते मंजूर.

डॉ. राधिका इनामदार : धन्यवाद सर. विषय क्रमांक पाच सन २०२५-२६ या वर्षावधीचे हिशोबाच्या तपासणीसाठी लेखा परीक्षकांची नव्याने नियुक्ती करण्याचा विचार करणे.

पराग शशिकांत ठाकूर : मी पराग शशिकांत ठाकूर असे सुचवतो की माननीय नियामक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या सर्व संस्थांचे सन 2025-26 या वर्ष कालावधीचे हिशोबांचे तपासणीसाठी लेखा परीक्षक म्हणुन मेसर्स डी. आर. बी. एस. व्ही. ॲन्ड असोसिएटेस चार्टर्ड अकाउंटंट पुणे यांची नियुक्ती करण्याचा बाबत विचार करणे.

सुधीर शंकर काळकर : मी सुधीर शंकर काळकर यास अनुमोदन देत आहे.

ॲड. सदानंद फडके : मेसर्स डी. आर. बी. एस. व्ही. अँड असोसिएटर्स यांच्यातर्फे कोणी आज उपस्थित आहे का? ही नियुक्ती केल्यास आपण काम करायला तयार आहात का?

डी. आर. बर्वे : ही नियुक्ती झाल्यास आम्ही काम करण्यास तयार आहात.

ॲड. सदानंद फडके : हे गेल्या वर्षी सुद्धा आपले लेखापाल होते. या पार्श्वभूमीवर, धन्यवाद. या पार्श्वभूमीवर त्यांच्या नियुक्तीला कोणाचा विरोध असल्यास त्यांनी कृपया हात वर करावा. कोणाचाही हात वर न आल्याने ठराव सर्वानुमते मंजूर आणि या असोसिएटर्सचे प्रतिनिधी उपलब्ध आहेत. त्यांनी काम करण्यास संमती दर्शवली हे मी मुद्दाम आज का विचारलं? कारण अनेक वेळा असं होतं की नंतर ती संस्था कळवते की आम्हाला कार्य बाहुल्यामुळे काम करण्यास वेळ नाही म्हणून मी मुद्दाम विचारलं. धन्यवाद!

डॉ. राधिका इनामदार : धन्यवाद सर आणि बर्वे सरांनाही धन्यवाद देते. मी आता पुढचा जो आपला क्रमणिकेवरचा विषय आहे ते म्हणजे आपल्या सभासदांकडून वेळोवेळी काही वार्षिक सभेच्या काळामधे पत्रं येत असतात आणि काही सूचनाही केल्या जातात तर ह्या सूचनां वजा जी पत्रं आहेत त्या पत्रांचं आता मी थोडक्यात वाचन करते. काही प्रश्न असतील तर ते सर त्याचं उत्तर देतील पहिलं पत्र आहे संजय पारनाईक म्हणून आहे सदस्य आज उपस्थित आहेत का ते त्यांनी आपल्याला अशी सूचना केली आहे की तुमच्या पुणे, मुंबई, सोलापूर सगळीकडे संस्था आहेत तर अहिल्यानगर मध्ये तुम्ही आता शैक्षणिक संस्था सुरु करावी आणि त्याच्यासाठी लागणारं सर्वतोपरी सहकार्य जे आहे ते आम्ही आपल्याला देऊ अशी एक सूचना त्यांनी आपल्याला पत्रामध्ये केली आहे.

त्यानंतरचं पत्र आहे. श्री राघव अष्टेकर सर त्यांनी आपल्याला सूचना दिलेली आहे की आपलं जे जिमखाना इमारत आहे. शि प्र मंडळीची त्याचं नामकरण समारंभपूर्वक डॉक्टर दी. ब. देवधर यांच्या जन्मशताब्दी निमित्त आणि त्यांच्या

उपस्थितीमध्ये झाले होते. तर सदर नामफलक, जिमखाना इमारतीवर अनेक वर्ष होता आता दिसत नाहीये तर तो पुन्हा लावावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

ॲड. एस. के. जैन : आपली सूचना मंजूर करत आहोत.

डॉ. राधिक इनामदार : याच विषयामध्ये दुसऱ्या आणखीन दोन सूचना अष्टेकर सरांनी केलेल्या आहेत की स. प. महाविद्यालयाच्या मैदानाचा उपयोग अनेक खेळाडू घडवण्यासाठी गेले शतकांहून अधिक वर्षे झालेला आहे. आता त्यावरुन वाहनांची येजा क्रीडांगणाची गैरव्यवस्था, ट्रॅकची दुरवस्था अशा गोष्टी होत आहेत. तर महाविद्यालयाच्या विद्यार्थी आणि खेळाडूंना या संदर्भांमध्ये मैदान सुव्यवस्थित करून द्यावे आणि सन 1980 पासून या मैदानाची सेवा करण्याची संधी संस्थेने त्यांना दिली होती. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी मैदानासंदर्भातल्या काही भावना आपल्या व्यक्त केल्या आहेत. या इथे मांडाव्यात अशी त्यांनी इच्छा व्यक्त केली आहे. मला वाटत आष्टेकर सर इथे उपस्थित आहेत आहेत तर आपल्या सूचनांचा सर आपण नक्कीच गंभीरपणे विचार करणार आहोत.

त्यानंतर भरत अभंग म्हणून आहेत. त्यांचं एक पत्र आलेलं आहे. त्यांनी काही सूचना केलेल्या आहेत ते आपले सदस्य आहेत आणि त्यांनी अशी विनंती केली आहे की सर्व सभासदांना मैदानावर चालण्यासाठी मोफत सुविधा उपलब्ध करून द्यावी. पोहण्यासाठीच्या शुल्कामध्ये सवलत देण्यात यावी आणि सभासदांच्या पाल्यासाठी संस्थेच्या शाळा कॉलेजमध्ये प्रवेशासाठी प्राधान्यक्रम देण्यात यावा.

आणखी काही ईमेल आणि पत्र आलेली होती. त्यांनी काही किरकोळ दुरुस्त्या आपल्याला सुचवलेल्या होत्या. वार्षिक अहवालात त्या आपण त्यांच्या सुचनेनुसार केलेल्या आहेत.

तर पुढच्या विषयाकडे आपण वळतो आहोत. आता माननीय अध्यक्ष फडके साहेब यांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांचा आपल्याला विचार करायचा आहे, तर आयत्या वेळची सूचना किंवा काही विचार कोणाला मांडायचे असतील तर तसं मांडायला हरकत नाही. माझी एक विनंती फक्त माईक आपल्याकडे येईपर्यत थांबाव माईक आला की बोला.

ॲड. सदानंद फडके : एक मिनीट. आपल्याला नम्र विनंती : सूचना करायच्या अगोदर आपलं पूर्ण नाव सांगावं म्हणजे मिनीट्समध्ये नोंदीमध्ये आपल्या नावाची नोंद होईल.

नमस्कार मी ॲडव्होकेट निलेश मोहन मांढरे माझी संस्थेला एक अशी सूचना राहील की माननीय जैन सर हे स्वतः एक सुविख्यात कायदे पंडित आहेत तर आपल्या संस्थेचं एखादं लॉ स्कूल या पुणे शहरामध्ये निर्माण करण्यात आपण पुढाकार घ्यावा अशी माझी त्यांना सूचना राहील. त्याचप्रमाणे सरांनी मघाशी अजून एक आम्हाला काही सुचवण्यासाठीही सांगितलं होतं तर ड्रग फ्री कॅम्पस त्या रिलेटेड मग त्या कार्यशाळा वगैरे या गोष्टी आयोजित करण्यात या संस्थेतर्फे तर त्याचप्रमाणे ज्या कोणा इतर सहकारी मित्रांना माहिती असतं की माझा मित्र ड्रग्जच्या आहारी गेलेला आहे तर त्यांनी पुढे येऊन संस्थेला याबाबतीत माहिती कळवावी आणि त्यांची नावे गुप्त ठेवण्यात यावीत याचा त्यांना धीर देण्यात यावा. त्याचप्रमाणे जर अशी काही मुलं जर आपल्या संस्थेमध्ये आढळली त्यांचं समुपदेशन करून त्यांच्या पालकांना त्यांचं rehabilitation साठी आपल्या संस्थेतर्फे काही मार्गदर्शन करता येत आहे. त्याकडे पण लक्ष द्यावं. तसंच जे वुमन सेफ्टी म्हणून एक सिपी सरांनी सांगितलेलं होतं. दामीनी पथकाचं आपले इथे जास्तीत जास्त त्यांचे राऊंड इथं आयोजित करण्यात यावेत.

याचप्रमाणे स्थानिक पोलीस स्टेशनकडून पण इथे जास्तीत जास्त फेरफटके मारण्यात यावे जास्त करून कॉलेज भरायच्या टायमिंगला आणि कॉलेज सुटण्याच्या टायमिंगला. याबाबतीत आपण लक्ष देण्यात यावं. धन्यवाद !

सुहास नारायण नातू सूचना अशी आहे की आर्थिकदृष्ट्या जे दुर्बल घटक आहेत त्यांना शैक्षणिक शुल्कात सवलत देण्याचा विचार व्हावा.

नमस्कार दत्तात्रय नाईकवाडे वाघोली माझी अशी सूचना आहे की संस्थेचा हेल्पलाईन नंबर असावा मघाशी जसं ड्रगच्या संदर्भात सांगितलं तर आपल्या आजूबाजूला कोण ड्रग ॲडिक्ट आहेत किंवा त्याच्या व्यसनाधीन तिकडे चालले आहे तर किमान आपल्यापैकी काही जणांना ती माहिती झाली तर त्याच्यावरती बॅकग्राउंडला आपल्याला काही प्रयत्न करता येतील. पण ती नावं आपल्यापर्यंत आली तर त्याच्यावरती तसं काम करता येईल.

नमस्कार, मी राघवेंद्र व्यंकटेश देशपांडे मेंबर क्रमांक ६०१० वेगळ्या क्षेत्रामध्ये आपण संस्थेत काम केलेलं आहे. वेलिंगकर आहे किंवा एमबीए कॉलेज आहे. पण याच्यामध्ये मला असं सांगावासं वाटतं की आपण इनक्युबेशन सेंटर जर चालू केलं तर स्मार्ट हॅकेथॉन सारख्या काही स्पर्धा आहेत किंवा आपण ज्या काही इनोवेशन केलेल्या आहेत त्याला पुढे स्टार्टअपमध्ये आपल्याला कनव्हर्ट करता येतील. त्यामुळे इनक्युबेशन सेंटर हे आपल्या पूर्ण एसपीएमचं असावं ते कदाचित पुण्याला असेल किंवा मुंबईला असेल. पण जेणेकरून विद्यार्थ्याला पुढं एक स्टार्टअपसाठी मदत होण्याची शक्यता आहे. धन्यवाद!
महाराष्ट्र शासनाचा उच्च तंत्रशिक्षण विभागाचा आपण आपल्या संस्थेकडे सिव्हिल सर्विसेसचा अभ्यासक्रम.
तर हा खूप चांगला निर्णय आहे आणि भविष्यामधे आपल्या स्वतःचा म्हणजे आपल्या महाविद्यालयाचा त्याचा एक पॅटर्न असावा. इथपर्यंत त्याला पुढे नेता येईल. थोडी आत्मप्रौढी म्हणून नाही, म्हणजे माझी स्वतःची एमपीएससीची सात वेळा निवड झालेली आहे तर त्या उपक्रमामधे मी खूप मदत करायला तयार आहे. आम्ही महाविद्यालयाच्या प्राचार्यांना भेटून देतो. खूप चांगल्या पद्धतीने.

कृष्णकांत सातव शिक्षण प्रसारक मंडळी या आपल्या या संस्थेच्या मुख्य ज्या संस्था आहेत त्या पुणे शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये आहेत. आता पुण्याचा जो विस्तार चहुबाजूला होतोय मुख्यत्वेकरून पुण्याच्या पूर्व भागामध्ये आपल्या संस्थेच्या शाखा सुरु व्हाव्यात अशी आमची विनंती आहे.

डॉ. राधिका इनामदार : आणि कोणी आहे ज्यांना सूचना करायच्या आहेत हा एक मिनिट.

नमस्कार मी ॲडवोकेट दशरथ रामचंद्र घोरपडे - माजी मरीन कमांडो इंडियन नेव्ही, माजी प्रमुख विश्वस्त श्री मार्तंड देव संस्थान जेजुरी. मला असं वाटत आहे की डिफेन्स रिलेटेड असे की सैनिक स्कूल पाचवीपासून, त्यानंतर राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून सातवी ऍडमिशन. त्यानंतर परत सैनिक स्कूल नववी ॲडमिशन आणि परत एसपीआयला ॲडमिशन जी की संभाजीनगरला आहे. सर्विस प्रिपरेटर इन्स्टिट्यूट जे की नॅशनल डिफेन्स अकॅडमीचं फिडर इन्स्टिट्यूट आहे. त्याच्या रिलेटेड काही मार्गदर्शक विद्यार्थ्यांना योग्य वेळेत झालं तर एनडीएमध्ये किंवा सीएमईमध्ये किंवा एफएमसीमध्ये किंवा सेंट्रल गव्हर्नमेंटचा जो भारताचा कोटा आहे त्याच्यामध्ये महाराष्ट्रातील किंवा पुण्यातली मुलं किंवा आपल्या संस्थेची मुलं जास्तीत जास्त जातील. त्यासाठी मी कधीही मार्गदर्शन वगैरे लागलं तर ते करायला तयार आहे. त्याची कृपया घेऊन संधी द्यावी आणि आपल्या महाराष्ट्रातील मुलं सेंट्रल गव्हर्नमेंटे मध्ये जास्तीत जास्त जावीत त्याबद्दल सूचना आहे.

नमस्कार मी डॉक्टर मयुरेश घारे पुणे शहरात गेली १६-१७ वर्षांपासून मी मॅनेजमेंट एज्युकेशन क्षेत्रात कार्यरत आहे. ह्या कार्यामध्ये मी इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्शन ह्या क्षेत्रामध्ये बरंच कार्य केलेलं आहे आणि म्हणजे तळमळीची अशी इच्छा आहे की आपल्या शि. प्र. मंडळी संस्थेतर्फे जे आत्तापर्यंत जे वेगवेगळे प्रोफेशनल एजुकेशन इन्स्टिट्यूशन सुरू चालल्या आहेत किंवा प्रत्येक शाखेतर्फे इंडस्ट्री बरोबर कोलॅबरेशन करण्याचे जे एफर्ट्स चालू आहेत त्याचं मी अतिशय कौतुक करतो. नक्कीच त्या दृष्टीनं उत्कृष्ट काम चालू आहे. पण प्रत्येक विभागातर्फे सेपरेट अशा प्रकारचे कम्युनिकेशन करण्याच्या ऐवजी जर का आपल्या शि. प्र. मंडळी संस्थेचं एक सेंट्रलाइज्ड कॉर्पोरेट रेशन सेल उभं झालं आणि त्यामध्ये प्रत्येक शाखेमधले काही प्लेसमेंट इन चार्ज सिनीअर प्राध्यापक एकत्र आले आणि त्यांचं एकत्र कोऑर्डिनेशन करून संस्थेचा कोणीही प्रतिनिधी मी स्वतः त्यात इनिशिएटीव्ह घ्यायला तयार आहे आणि त्या सेल तर्फे इंडस्ट्रीला अप्रोच करून त्यांच्या गरजा जाणून घेऊन

त्यानुसार सिलॅबस डिझाईन केले आणि त्यानुसार जर का आपला करिक्युलम डिझाईन केला तर मुलांना जॉब मिळवण्याच्या दृष्टीने, एंटरप्रेनरशिपच्या दृष्टीने, स्टार्टअप्सच्या दृष्टीने, इन्क्युबेशन सेंटरच्या दृष्टीने जर आपण काही मदत करू शकलो तर त्याचा खूप चांगला प्रभाव पडू शकतो असं माझं म्हणणे तर यादृष्टीने काही आपण जर ठोस पावलं उचलू शकलो तर मी स्वतःहून त्याच्यामध्ये माझं योगदान द्यायला तयार आहे. मी अमिटी इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीमध्ये कॅर्पोरेटर रिलेशन हेड म्हणूनही काम केले आहे आणि तो अनुभव मी नक्कीच तिथे वापरीन असं माझं विनंती आहे आणि सजेशनही आहे.

नमस्कार मे डॉक्टर संतोष कुमार, डिन स्टुडंट कॉलेज ऑफ इंजिनियरींग मॅनेजमेंट, वाघोली, पुणे. मेरा ऐसा मानना है सर, की जो आपनी सभी संस्थान है, टोटल वहाँपे टेक्निकल नॉन टेक्निकल क्लबस जो है जैसी हमारी इन्स्टिट्यूट में 24 क्लबस स्टार्ट किए हुए है जिससे बच्चो की बहोत ग्रोथ होती है] और इस तरह के जो क्लब है, रोबोटिक्स क्लब है, अपना लायन्स क्लब है, जैसे ये फोटोग्राफी, एथिकल क्लब है , ऐसी बहुत सारी क्लब है जिससे बच्चो का ओव्हरऑल ग्रोथ होगा और ओव्हरऑल ग्रुमिंग हेगा। यस थँक यू.

डॉ. राधिका इनामदार : अजून कोणाला बोलायचं नाही ना म्हणजे?

आत्ताच ताजाच मेंबर झालेलो आहे. माझं नाव सी ए महावीर चनौदिया सूचना अशी होती. म्हणजे कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी की बारावीपर्यंत तर ठीके पण बारावीनंतर म्हणजे कॉमर्सचा जो कॉलेज अटेन्डन्स आहे. सेव्हनटी पर्सेंटचा रूल आहे. त्याच्यामुळे बऱ्याच मुलांना जे हुशार आहेत त्यांना परटीक्युलरली. कॉलेजेस सोडून द्यायला लागतात तर नंतर कुठलं तरी डमी कॉलेज वगैरे अटेंड करण्याचं कंप्लशन असं बनलेलं आहे. तर आपल्या संस्थेच्या माध्यमातून जर आपण कॉमर्स फिल्डमधल्या मुलांसाठी जर आपण सीए, सीएस, आयसीडब्ल्यूए च्या रिलेटेड काही अडॉन सपोर्ट जर आपण कॉलेजमधून जर देऊ शकलो जो अदरवाइज क्लास प्रोव्हाईड करत आहेत, त्या पद्धतीचं जर आपण काही फ्रेमवर्क उभं करू शकलो तर खूप काही चांगलं कटऑफ आता आपल्या संस्थेचं 83 टक्क्यांच्या आसपास आहे. ॲडमिशनसाठी ते बरंच वरती जाऊ शकतं कारण बरंच चांगलं टॅलेंट जे आहे ते आपल्याकडे अट्रॅक्ट होऊ शकतं. त्यातन मोठे चांगले विद्यार्थी आपल्या संस्थेच्या माध्यमातून घडू शकतात. त्यामुळे कॉमर्स जे विद्यार्थी ज्यांना सीए आयसीडब्ल्यू करायचं आहे त्याबद्दल सायन्ससाठी जे याच्यासाठी जे प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थी आहेत त्यांच्यासाठी एक वेगळी काहीतरी व्यवस्था आपल्या संस्थेच्या माध्यमातून व्हावी अशी विनंती आहे.

नमस्कार मी सुधीर मधुकर इनामदार नू. म. वि. चा ७० सालचा एसएससी वाला ,सभासद क्रमांक ५७५५. मी सध्या पुणे मराठी ग्रंथालयात कार्यवाह म्हणून कार्यरत आहे. विषय असा आहे की मराठीला नुकताच म्हणजे राजभाषा अभिजात मराठीचा दर्जा मिळाला. दुर्देवाची परिस्थिती अशी आहे की मराठीबद्दल इतकी अनास्था आहे. शाळेपासून की मराठीचं अक्षरलेखन आणि शुद्धलेखन याकडे बऱ्याच ठिकाणी दुर्लक्ष केलं जातं. भावना पोहोचल्यानं असा त्याच्यातला एक अनुभव घेतला जातो. यासंदर्भात माझी एक विनंती आहे की या विद्यार्थ्यांचं हस्ताक्षर आणि शिक्षकांसाठी मराठी शुद्धलेखन यासंदर्भात आपल्याला काही करता आलं तर मी नक्की मदत करू शकेन यासंदर्भात मी काही ठिकाणी संवाद साधलेला आहे. भाषण आहे दिलं म्हणणं धाडसाचं आहे. परंतु काही ठिकाणी शिक्षकांशी संवाद साधलेला आहे आणि त्याचा उपयोग होतो असं लक्षात आलेलं आहे. एका शिक्षकाला शुद्धलेखनाचे नियम कळले की किमान वर्गातल्या 50 मुलांच्यापर्यंत ते जातात यादृष्टीनं काही करता आल, तर मी संपूर्णपणे मदत करायला तयार आहे. धन्यवाद!

महेश देशपांडे : मी प्राध्यापक आहे, पीएच. डी. मार्गदर्शक आहे. आपली संस्था खूप जुनी आहे आणि आता तसं पाहीलं तर खेळामध्ये पण बऱ्याच फॅसिलिटी आपल्याकडे आहेत. २०३६ किंवा २०४० चं ऑलिम्पिक जे आहे त्याच्यासाठी भारत बिडींग करतो आहे. १० ते १५ वर्षांचा कालावधी आपल्याकडे आहे तर या दृष्टीने आपल्या संस्थेच्या माध्यमातून काही ऑलिंम्पिक पटू जर तयार होऊ शकत असतील तर त्यादृष्टीनं आपल्याकडे काहीतरी कार्यक्रम असायला हरकत नाही

म्हणून मग एखादी स्पोर्टस कमिटी स्वतंत्र समिती जर आपल्या संस्थेनं केली तर त्याचा उपयोग होईल आणि एखादं स्पोर्टस, क्रीडा धोरण आपल्याला तयार करता येईल आपल्या संस्थेचं आणि ऑलिंपिकसाठी काही योगदान देता येईल तर ते अतिशय उत्तम होईल. धन्यवाद!

हॅलो माझं नाव यशवंत सुरेश जाधव. मध्यंतरी माझे एक मित्र आहेत मुकादम म्हणून तर त्यांची मुलगी मला वाटतं. एक हॉकी मध्ये प्राविण्य खूप मिळवलेलं आहे आणि शूटींगमध्ये पण त्याला ज्यावेळेस फॉर्म भरण्यासाठी त्यांनी रिक्वेस्ट केली होती. त्याला खूप अडचणी आल्या होत्या तर अशा अडचणी कुठल्याही विद्यार्थ्यांना आणि खेळाडूंना येऊ नये अशी माझी इच्छा आहे, सूचना आहे.

डॉ. राधिका इनामदार : मला वाटतं बहुतेक सभासदांच्या सूचना संपल्या असतील. खरं म्हणजे आमच्यातर्फे तुम्हाला खूप मनापासून धन्यवाद की तुम्ही सगळ्यांनी उत्स्फूर्तपणे आपल्या सूचना आमच्यापर्यंत पोहोचविल्या आणि या सर्वसाधारण सभेला एक जिवंतपणा आणलात त्याबद्दल शि प्र मंडळी तर्फे तुमचं सगळ्यांचं अभिनंदन आणि आभार.
आता माननीय अध्यक्ष फडके साहेबांचं भाषण ऐकायला आपण उत्सुक आहोत.
पण तत्पूर्वी, मी माननीय नियामक मंडळाचे अध्यक्ष जैन सर यांना विनंती करते की आमचे शांत, धीरगंभीर आणि खंबीर नेतृत्व ॲडव्होकेट सदानंदजी फडके यांचा शि. प्र. मंडळी तर्फे सत्कार करावा रोप देऊन.

ॲड. जैन सर यांनी मा. सदानंद फडके यांचा सत्कार केला.

डॉ. राधिका इनामदार : तसंच आमच्या पाठीशी कायम उभे राहणारे मनमुराद आणि मनमोकळे दिलखुलास व्यक्तिमत्व आणि दिलखुलासपणे आमच्या सगळ्यांचं कौतुक करणारे आमच्या शि प्र मंडळीचे उपाध्यक्ष श्री गजेंद्र पवार यांचाही सत्कार रोप देऊन करावा अशी मी उपाध्यक्ष चितळे सर यांना विनंती करते.

मा. चितळे सर यांनी मा. गजेंद्र पवार यांचा सत्कार केला.

डॉ. राधिका इनामदार : आता मी माननीय अध्यक्ष फडकेसाहेबांना विनंती करते की त्यांनी आपलं मनोगत व्यक्त करावं. धन्यवाद!

ॲड. सदानंद फडके : नियामक मंडळाचे अध्यक्ष तत्पूर्वी शिक्षण प्रसारक मंडळीचे उपाध्यक्ष माननीय गजेंद्रजी पवार, नियामक मंडळाचे अध्यक्ष, माननीय सोहनलालजी जैन, उपाध्यक्ष श्रीकृष्णजी चितळे. सेक्रेटरी, राधिकाजी इनामदार आणि उपस्थित सर्व सभासद बंधु भगिनींनो सगळ्यांना सप्रेम नमस्कार.
१८८८ साली तीन शिक्षक प्राथमिक शाळेचे म्हणजे पहिली ते चौथी विद्यार्थ्यांना शिकवणारे एकत्र येतात. मनात एक संकल्पना घेऊन येतात की, आपल्याला काहीतरी करायचं आहे. आपण तर शिक्षण संस्थेमध्ये काम करतो. शिक्षकी वृत्ती आपली. आपण कोणी त्या अर्थानं उच्च विद्या विभूषीत नाही. त्याच वेळेला पुणे शहरामध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी. अशा अनेक संस्था उदयाला येत होत्या. त्यावेळेला पूर्णपणे मराठी नाव घेऊन उदयाला आलेली एकमेव संस्था म्हणजे शिक्षण प्रसारक मंडळी. कुठेही आडग्लभाषीय शब्दांचा वापर न करता स्थापन केलेली, आज तिचा बघता बघता मोठा वृक्ष झालेला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मग असे बोलताना एका सदस्याने मी ताजा सदस्य असा एक शब्द प्रयोग केला. आपल्या इथे ताजा आणि शीळ असलं काही नाही. जे पूर्वीच आहे त्यांची मनोवृत्ती अजूनही ताजी आहे म्हणूनच ते इथे उपस्थित राहतात. फार छान सूचना केल्या लोकांनी. तुमच्या प्रत्येक सूचनेची नोंद घेतलेली आहे आणि तुमचा नाव पत्ता हा इथे असतो. त्या त्या संबंधित जी संस्थाचालक मंडळी ती आपल्याशी संपर्क साधतील. म्हणजे उदाहरणार्थ की आपण सांगितलं की मी एमपीएससी किंवा सनदी अधिकाऱ्यांच्या परीक्षेची तयारी करून घेतो. गेल्याच आठवड्यात एक मेळावा झाला. त्यामुळे त्या संबंधात योग्य ती व्यक्ती आपल्याशी संपर्क साधेल.

या सगळ्या सूचनांचा सूचनाकर्त्यांनी सांगितलेल्याप्रमाणे आपल्याला अवलंब करता येणार नाही. म्हणजे सगळ्या सदस्यांच्या मुलांना प्राधान्यांनी प्रवेश द्यावा. खरंच व्यावहारिक दृष्ट्या ते शक्य नाहीये आणि म्हणून तिथं योग्य तो निर्णय घेतला जाईल. आज आपण सगळे एकत्र आलो. बरोबर वर्षभराने आलो. वर्षाचा मागोवा घेत असतो आपल्यातनं जे प्रतिनिधी निवडून जातात त्यातूनच नियामक मंडळ बनत नियामक मंडळातच निवडणुका होतात. त्यामधली एक व्यक्ती सर्वजण ठरवतात की हा आपला कप्तान आणि गेल्या पाच वर्षात त्यांनी काय काय काम केलं हे आपल्या समोर सोहनजी यांनी मांडलं आहे. त्यांनी समाधान व्यक्त केलं आहे. त्याअर्थाने तुम्ही आम्ही सगळेजण म्हणू शकता की समाधानी आहोत. 10 वर्षांपूर्वीचा जो कालावधी होता संस्थेचा तो कालावधी एक दुःस्वप्नाचा होता पण ते स्वप्न ते दुःस्वप्न आता दूर झालं आहे. चांगला कालावधी येऊ घातला आहे. या पार्श्वभूमीवर सदस्यांचं सकारात्मक सूचना देणारं हे जे संबोधनं आहे हे या सभेला अभिप्रेत आहे. या अभिप्रेत आणि त्याप्रमाणे आपण ते करतोय. तांत्रिकदृष्ट्या उगाचच हा ठराव मंजूर बिंजूर असं नाहीये आणि म्हणून राधिकांजींनी जे सांगितल की जिवंतपणा येतो, तो जिवंतपणा हा येतो. संस्थेचं उद्दिष्ट जे आहे ते उद्दिष्ट स्पष्ट आहे. भविष्य कालावधीमध्ये आपल्या कुटुंबामध्ये जन्माला आलेल्या व्यक्तीनं कोणत्याही शाखेचं शिक्षण घेण्याची इच्छा प्रदर्शित केली तर ते शिक्षण आपल्या संस्थेच्या या वृक्षाखाली उपलब्ध झालं पाहिजे हा आमचा संकल्प आहे. आज आम्हाला माहित आहे की आमचं मेडिकल कॉलेज नाहीये. आज आम्हाला माहिते की आमचं इंजिनिअरींग कॉलेज नाहीये. आज आम्हाला माहिती की आमचं डेंटिस्ट कॉलेज नाहीये. आज आम्हाला माहिते की आमचं लॉ कॉलेज नाहीये पण त्याच्याकरता प्रयत्न हे सगळे चालू आहेत हे मी तुम्हाला सांगतो. फक्त ते प्रयत्न पूर्णपणे अस्तित्वात येईपर्यंत काही वेळ लागतो. तो कालावधी आता आहे पण आगामी कालावधीमध्ये ह्या सगळ्या शाखांची शिक्षणं आपल्या संस्थेच्या माध्यमातून लोकांना उपलब्ध होणार आहे. आता जे काम झालं त्याच्याबद्दल निश्चितपणे आनंद आहे. पण रेग्युलेटिंग कौन्सिलचा चेअरमन हा जणू काही राजा असतो.

आपल्या इथे संस्कृतमध्ये एक सुभाषीत आहे, ते सुभाषीत अस आहे की गुण आणि अवगुण या परिस्थितीत सापेक्ष संकल्पना आहेत. तुम्हाला काय काम करायचंय त्याच्यावर तो गुण आहे तो सद्गुण आहे का? दुर्गुणही ठरत असतं ते सुभाषीत अस सांगतं असंतुष्टो द्विज नष्ट: संस्तुष्टाश्च महिपति| सलज्जा गणिका नष्ट: निर्लज्जाश्च कुलांगना || अर्थ असा की आपल्याला माहीत आहे. संतुष्ट हा गुण आहे पण तो सुभाषितकार काय सांगतो? लक्षात घ्या की तोच गुण तुम्ही काय काम करता याच्यावर अवलंबून आहे. जो राजा आहे त्या राजाने कधीही संतुष्ट व्हायचं नसतं. राजांनी कायम असंतुष्ट राहिलं पाहिजे की अरे माझ्या प्रजेच्या प्रत्येक नागरिकाच्या पायात चपला पाहिजेत. मला अनेक लोकं अनवाणी दिसतायत. माझा संकल्प पुढच्या वर्षी मी प्रत्येकाच्या पायात पादत्राणं देईन, पण पादत्राणं आल्यानंतर त्यांनी संतुष्ट व्हायचं नाही. मला पुढच्या वर्षी प्रत्येकाच्या पायामधे गमबुट असतील तो कायम असंतुष्ट राहिला पाहिजे तर त्या राज्याची प्रगती होते. त्याप्रमाणे रेग्युलेटिंग कौन्सिलचा जो चेअरमन त्यांनी कायम असंतुष्ट राहिलं पाहिजे की नाही मला हे हे करायचं हे करायचं हे करायचं असंतुष्टो द्विजा नष्टा जो ब्राह्मण तो जर असंतुष्ट राहायला तो तो नष्ट पावतो. एखाद्या ठिकाणी तुम्ही पुजेला बोलवलं असाल एखाद्या ब्राह्मणाला आणि त्याला दक्षिणा दिली आणि त्यांनी नाराजी व्यक्ती केली. नाही नाही अजून २०० द्या २०० दिली. नाही आज ५०० द्या, तो संतुष्ट ब्राह्मण हा नक्की नष्ट पावतो कारण तो यजमान त्याला परत बोलवीत नाही. संतुष्टचै महिपती अगोदरच सांगून सलज्ज्याम् गणिका नष्टा दुर्दैवाने जर एखाद्या महिलेला वारांगनेचा व्यवसाय स्वीकारावा लागला. देवदासी, वेश्या तर तिनं सलज्ज राहायचं नसतं. तिला त्या व्यवसायाकरता निर्लज्जच व्हावं लागतं. निर्लज्जांच कुलांगना. एखादी कुलस्त्री आहे ती कुलस्त्री निर्लज्ज होऊन चालत नाही. ती नष्ट पावते सुभाषितातला मतितार्थ घ्यायचा झाला तर मॅनेजिंग कौन्सिलने पुढच्या 10 वर्षाचे कार्यक्रम ठरवले पाहिजेत की ना मला पुढच्या पाच वर्षामध्ये लॉ कॉलेज सुरु करायचे आहे. त्याच्या पुढच्या वर्षामध्ये मला इंजिनिअरिंग सुरु करायचं आहे. संस्था ही तुमच्याकडे सुपूर्त केल्यानंतर पुढच्या 20 वर्षाचा मास्टर प्लॅन पाहिजे. त्यामध्ये ऑलिम्पिक होणार असेल तर त्याकरता आपण काय करू शकतो आणि म्हणून उर्वरित कालावधीमध्ये आताच्या रेग्युलेटिंग कौंसिलला माझी नम्र विनंती राहील की पुढच्या 20 वर्षाचा मास्टर प्लॅन तयार करा तर

आपण यशस्वी होणार आहेत. आज देशासमोरची जी परिस्थिती आहे ती योग्य वेळेमध्ये मास्टर प्लॅन न केल्या गेल्यामुळे. लोकसंख्या वाढीचा वेग लक्षात न घेता शिक्षण संस्था वाढवल्या नाहीत म्हणून शाळा प्रवेशाचा प्रश्न जटील बनला. लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात हॉस्पिटल्स काढली नाहीत म्हणून रुग्णांना प्रवेशासाठी वशिले लावावे लागतात. म्हणून हा मास्टर प्लॅन करताना या सगळ्याचा विचार करावा आणि आगामी कालावधीमध्ये राष्ट्रासमोरची जी जी आव्हानं आहेत त्या आव्हानांचा नुसता मुकाबला नाही तर त्या आव्हानांवर मात करुन माझं राष्ट्र जगामध्ये सर्वोत्तम कसं राहील याची विचारसरणी तयार करणारा तरुण वर्ग या संस्थेला तयार करायचा आहे आणि म्हणून त्यादृष्टीनं आपण आपली कार्यप्रणाली ठरवली पाहिजे म्हणून मास्टर प्लॅन आपण तयार करावा अशी माझी तुम्हाला विनंती राहील. अजूनही दोन महिन्याचा खूप कालावधी आहे.

आपण सर्वजण आलात, तत्पूर्वी दोन सूचना, आपण दरवर्षी सरस्वती मातेचं पूजन करतो पण आज तुम्ही विसरलात ही गोष्ट योग्य नव्हे. दुसरं आपल्या संस्थेचे जे चार संस्थापक आहेत, त्या संस्थापकांच्या प्रतिमेचं पूजन दरवर्षी झालं पाहिजे. ते या वर्षी झालं नाही याची गंभीर दखल घ्यावी. एकदम मला आठवलं. हरीभाई देवकरण बरोबर राजेश हरीभाई देवकरण आपली जी प्रशाला आहे, सोलापूरची त्याच्या ज्युनियर कॉलेजचा सुवर्ण महोत्सव होता. ज्या हरीभाई देवकरणांनी आत्ताच्या भाषेमध्ये करोडो रूपयांची देणगी दिल्यामुळं ती संस्था उभी राहिलेली आहे त्यांचे पणतू आज दुसऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये एका क्लार्कची नोकरी करताहेत. ते त्या कार्यक्रमाला उपस्थित होते हे लक्षात आल्यानंतर आम्ही सगळ्यांनी त्यांना स्टेजवर आमंत्रित केलं. त्यांचे अनंत उपकार त्यांच्या आजोबांचे, पणजोबांचे मानले आणि त्यांचा सत्कार केला. त्या माणसांनी डोळ्यात पाणी आणून सांगितलं की आज मी दुसऱ्या शिक्षण संस्थेमध्ये काम करतोय. पण माझ्या पणजोबांनी केलेल्या या धर्मकृत्याचं आज मला खरं स्वरुप कळलं. मला असं वाटतं की हे जे चार संस्थापक आहेत दामोदर सदाशिव करंबेळकर, कृष्णाजी बल्लाळ, डोंगरे, रामचंद्र भिकाजी कुलकर्णी आणि रामचंद्र गोपाल देव यांचे वंशज, वारस हे मुद्दाम संस्थेने शोधून काढावेत आणि त्या प्रत्येकाच्या एकेक वारसाचा सर्वसाधारण सभेमध्ये सत्कार करावा म्हणजे जेणेकरून त्यांनी केलेल्या सद्धर्माच्या सत्कृत्याची योग्य ती दखल घेतली जाईल असं मला वाटतं. कारण ते दानशूर होते. म्हणूनच ही संस्था उभी राहिली. त्यामध्ये परशुराम सर, परशुराम पटवर्धन. त्यांचा उल्लेख हे मी का सांगतोय की दानशूर माणूस मिळणं खरच कठीण असतं. ॥शतेषु जायते शूरः सहस्त्रेषु च पण्डितः। वक्ता दशसहस्त्रेष दाता भवति वान वा ॥ असं सांगितलं संस्कृतमध्ये आणि म्हणून संस्थेची वाटचाल योग्य रितीनंच चाललेली आहे. योग्य दिशेनंच चाललेली आहे. परंतु तो वेग आपल्याला वाढवला पाहिजे. काळ काम वेग ही गणितं लक्षात ठेवली पाहिजे. जेव्हा काळ कमी असतो तेव्हा कामाचा वेग वाढवावा लागतो. राष्ट्रासमोरची आव्हानं आपल्याला लक्षात घेतली पाहिजेत. जी एक सूचना होती की एनडीए किंवा सेनादलांमध्ये जाण्याकरता आपल्या मुलांना वेगळं मार्गदर्शन केलं गेलं पाहिजे. लेखणी आणि बंदुकं दोन्ही आपल्या मुलांना बरोबरीनं चालवता आल्या पाहिजेत. येणाऱ्या कालावधीमध्ये संस्था ही आव्हान सहज लीलया पेलेल या बद्दल माझ्या मनात शंका नाही. कारण संस्थेचे मालक असलेले सर्वसाधारण सभासद हे अत्यंत जागरुक आणि चलाख आहेत आणि दक्ष आहेत.

आपण येणाऱ्या कालावधीकरता संस्थेच्या भावी यशासाठी सर्वांना शुभेच्छा देऊ. आज तुम्ही सर्वजण आलात. शांतपणे सभेचं कामकाज चाललं याबद्दल आपल्या सगळ्यांचा मी ऋणी आहे. धन्यवाद जय हिंद जय महाराष्ट्र!

डॉ. राधिका इनामदार : धन्यवाद सर. आपण ज्या दोन सूचना शेवटी केल्या त्याची अंमलबजावणी नक्की होईल आणि त्या त्रुटी राहिल्याबद्दल मी सुरवातीलाच आपली माफी मागते. दिलगिरी व्यक्त करते आणि यापुढे अशी त्रुटी राहणार नाही याची खबरदारी आम्ही सगळेजण नक्की घेऊ असाही विश्वास तुम्हाला देते. मघाशी मी अशीच म्हणले की चुकून शेवटची जीबी असं म्हणलं तसं नाही. या नियामक मंडळाची ही शेवटची सर्वसाधारण सभा आहे. तशीच ही सचिव म्हणून माझीही शेवटची सर्वसाधारण सभा आहे.

तर माननीय अध्यक्ष फडके साहेबांनी जर माझी विनंती मान्य केली तर एकदोन शब्द फक्त मला वैयक्तिक बोलायचे आहेत ते बोलू का? धन्यवाद सर. २०१७ ला प्रभारी सचिव पद माझ्याकडे देण्यात आलं. त्यावेळी मला काहीच

कल्पना नव्हती की सचिव पदाची जबाबदारी काय असते? मी पूर्णपणे अनाभिज्ञ होते. हळूहळू शिकत गेले 2019 ला मी नियमित सचिव झाले.

२०१९ पासून २०१५ पर्यंत मला संस्थेने सचिव म्हणून काम करण्याची संधी दिली आणि जेव्हा सचिव म्हणून काम करत होते तेव्हा दोन गोष्टी मला खूप काय म्हणूया ताणयुक्त वाटल्या त्या म्हणजे कौन्सिलची मिटींग असते. आमच्या नियामक मंडळाची ती मिटींग कंडक्ट करावी लागते सचिवांना आणि सर्वसाधारण सभा पण सचिवांना कंडक्ट करावी लागते. या दोन्ही वेळेस मला खूप ताण यायचा आणि भीती वाटायची की आपल्याकडनं काही त्रुटी राहिली तर काय होईल. पण मला सांगायला आनंद होतो की सर्वसाधारण सभेच्या बाबतीमध्ये आमचे अध्यक्ष माननीय फडके साहेब नियामक मंडळाच्या सभेबाबत आणि सर्वच एकूण कामकाजाबद्दल आमच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष माननीय ॲडव्होकेट जैन सर गजेंद्र पवार सर आणि उपाध्यक्ष चितळे सर या चौघांनी मला खूप सांभाळून घेतलं. सहकार्य हा शब्द कधी असतो की मी परफेक्ट असेन तर सहकार्य पण खूप त्रुटी रहायच्या काही गोष्टी माझ्या लक्षात यायच्या नाहीत पण त्या चौघांनी मला वडिलकीच्या मायेनं मला सांभाळून घेतलं. मी खरंच आभारी आहे. त्याच कारण ही खूप मोठी जबाबदारी असते. हळू हळू मला त्याची जाणीव झाली आणि जाणीव होईपर्यंत सचिवपदाचा कालावधी संपत आला. तसंच आमच्या नियामक मंडळाचे सर्व सदस्य यांचेही मी आभार मानते की त्यांनी मला सांभाळून घेऊन माझ्याकडनं काम करवून घेतलं आणि एका व्यक्तीचा उल्लेख जर मी आज केला नाही तर तो माझी अक्षम्य चूक ठरेल. ती जेव्हा जनरल बॉडीची मिटिंग ठरते. नियामक मंडळामधे तारीख ठरते. त्या दिवसापासून जनरल बॉडीची मिटिंग संपून त्याचा सगळा अहवाल होईपर्यंतचा काळ सगळा संपेपर्यंत माझ्या वैयक्तिक सचिव म्हणून आणि आमचा ऑफिस स्टाफ आमच्या मागे एखाद्या पहाडासारखे खंबीरपणे उभे राहतात, ते म्हणजे आमचे किराड सर. सर मी आपले आभार नाही मानणार. मी आपल्या ऋणात राहू इच्छिते आणि असं सहकार्य आणि असा वडिलकीचा आधार जर मिळाल तर कुठलीच गोष्ट सर्वसामान्य व्यक्तीला शक्य होणार नाही असं होणार नाही असं मला नेहमी वाटतं.

पुन्हा एकदा तुमच्याही सगळ्यांचे मी आभार मानते. कारण काही सदस्य नवीन आहेत. आज पहिल्यांदाच साधारण सभेसाठी आलेले आहेत. पण खूप सदस्य अस आहेत की ते जुने २०१७ पासून मला इथे स्टेजवर बघतायत आणि सभा संपल्यानंतर येऊन प्रकर्षांनी मला असं जाणवतं की येऊन माझं कौतुक करतात आणि खरे सांगायचं तर कुसुमाग्रजांची जी कथा कविता आहे ना की फक्त पाठीवर हात ठेवून लढ म्हणा तेवढीच अपेक्षा असते की, एक कौतुकाची थाप आपल्या पाठीवर पडावी आणि ती नेहमीच तुमच्यासारखे सगळे आजीव सदस्य मला देत असतात म्हणून तुमचे ही मनःपूर्वक आभार. धन्यवाद!

ॲड. सदानंद फडके : राधिकाजी आपण आपल्या भावना व्यक्त केल्यात पण एक लक्षात घ्या द रोड ऑफ, तुम्ही भावनाविविश होऊ नका त्याचं कारण असय की, हा प्रवास, या प्रवासामध्ये एकमेकांना सहाय्य देतच आपण जातो आणि या ठिकाणी आपण सर्व सोशल वर्क करत असतो. चुका या होत असतात. द रोड ऑफ परफेक्शन इज ऑलवेज अंडर कन्स्ट्रक्शन. त्यामुळे ये तो चलता रहता है. फक्त यामध्ये महत्वाचं काय आहे की सगळ्यांचं उद्दिष्ट एकच पाहिजे की संस्थेची उन्नती आणि प्रगती आणि ती सगळी आहे म्हणूनच गेल्या 10 वर्षांमध्ये आपण काही करू शकलो. आपल्याला माहितेय संस्था कुठल्या गर्तेमध्ये 10 वर्षापूर्वी होती. पण आज कोणीही आपले विरोधक सुद्धा हे मान्य करतील की 10 वर्षांमध्ये आपण नक्कीच लक्षणीय सुधारणा केली आहे. अजूनही आपल्याला खूप करायचं आणि म्हणून आत्मसंतुष्ट होऊन राहणार नाही. तुम्ही भावनाविवश होऊ नका. आम्ही सर्वजण तुमच्या बरोबर आहोत या सर्व पार्श्वभूमीवर. मी जैन सरांना विनंती करतो, कारण या बसा तुम्ही तसं कारण त्यांचं टेन्यूअर संपतंय. त्यामुळे चुका बिका काही नाही. आपण सर्वजण सहाध्याही आहोत. आपण एका विशिष्ट ध्येयाकडे वाटचाल करत आहोत. चुका या होत राहणार फक्त त्या चुका संस्थेच्या हितासाठी योग्य का अयोग्य एवढीच फक्त फुटपट्टी आपण मोजतो.

ॲड. एस. के. जैन : मी संस्थेचे अध्यक्ष सदानंद फडके यांना विनंती करतो की त्यांनी डॉ. राधिका इनामदार मॅडम यांचा सत्कार करावा.

यानंतर ॲड. सदानंद फडके यांनी डॉ. राधिका इनामदार यांचा सत्कार केला.

डॉ. राधिका इनामदार : धन्यवाद सर. पुन्हा एकदा आपले मी मनापासून आभार मानते आणि आभार प्रदर्शनाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत आपण आलेलो आहोत तेव्हा आभाराची गोड कामगिरी मानण्यासाठी ज्यांचं मिठाईचं दुकान आहे आणि जे आमचे नियामक मंडळाचे उपाध्यक्ष आहेत अशा माननीय चितळे सरांना मी आमंत्रित करते की त्यांनी आपल्या सर्वांचे आभार मानावे. धन्यवाद सर.

ॲड. सदानंद फडके : मिठाईचं दुकान आहे आणि आम्हाला कोणालाही डायबिटीस नाहीये.

श्री. श्रीकृष्ण चितळे : सर्वांना नमस्कार, शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष सदानंद फडके, उपाध्यक्ष गंजेंद्र पवार सर नियामक मंडळाचे अध्यक्ष एस के जैन सर, तसेच सेक्रेटरी इनामदार मॅडम. इनामदार मॅडमनी त्यांचं मनोगत आत्ता व्यक्त केलं. मी त्यांचे आभार एवढ्याकरता मानतो की त्या टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन मधून रिटायर झाल्यानंतर नियामक मंडळाच्या विनंतीला मान देऊन त्यांनी मार्च अखेर सेक्रेटरीपद स्वीकारलं याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आपण सर्व सभासद दरवर्षी सभेसाठी आवर्जून उपस्थित राहता. या वर्षाची संख्या खूप आनंददायी आहे असं मला वाटत. आपण बांधत असलेल्या नारळकर इन्स्टिट्यूटच्या बिल्डींगमध्ये या हॉलपेक्षा मोठी कपॅसिटी असलेला हॉल करतोय आपण. मला वाटतं पुढच्या वर्षी आपण आपली सर्वसाधारण सभा तिथे घेऊ शकतो. त्या हॉलची जवळजवळ ५००ची कपॅसिटी आहे. जैन सरांनी आपल्या सर्व अचिव्हमेंट्स सांगितलेल्याच आहेत. त्याचप्रमाणे राघव अष्टेकर यांनी जी भावना व्यक्त केली तीच भावना माझी आहे की या 10 वर्षात सरकारी मागणीमुळे आम्ही एस. पी. कॉलेजचं ग्राऊंड स्वच्छ सुंदर करू शकलो नाही ही खंत आहे.

या नियामक मंडळाची ही पाचवी सभा आहे. माझी स्वतःची 10 वी आहे तर सर्व उपस्थितांचे आभार मानतो. सभेचे अध्यक्ष फडके सर व उपाध्यक्ष गजेंद्र पवार उपस्थित आहेत. त्याबद्दल त्यांचे आभार. त्याचप्रमाणे डी आर. बर्वे अँड असोसिएट याचे बर्वे सर इथे हजर आहेत. त्यांनी योग्यवेळी आम्हाला सूचना केल्या. आपले स्टॅच्युटरी ऑडिटर आहेत ऑडिट रिपोर्ट त्यांचा आपल्याला मिळालाच आहे. त्याचप्रमाणे कमलेश पाठक हे आपले कन्सलटंट आहेत म्हणून मी त्यांचे आभार मानत नाही, परंतु वेळोवेळी आपल्या सर्व संस्थांचे जे अकाऊंट्स आणि त्यांचे असिस्टंट अकाऊंटंट आहेत त्यांना टीडीएस संदर्भात जागरुकता निर्माण करण्याकरिता ते दर २, ३ महिन्यांनी एक मेळावा घेत असतात आणि त्याला आवर्जून ते आणि त्यांचे पार्टनर हजर असतात. याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. संस्थेच्या शैक्षणिक ज्या गोष्टी आहेत त्या सुरळीत करण्याकरिता कायमच आघाडीवर असते. अनेकांना अनेक इच्छा असतात त्या आपल्या सभासदांनी आपल्याला सांगितल्याचं आहेत. त्यातील काही खरोखरीच इम्प्लिम्मेंटेशन करण्यासारख्या आहेत आणि येणारं नियामक मंडळ ते नक्की करेल अशी मला खात्री वाटते. सरस्वती वंदनाकरता ज्या एसपीएम इंग्लिश मिडियम स्कूलच्या प्रार्थना साठे ज्यांनीआपल्या सरस्वती स्तवनाने आपलं स्वागत केलं आणि सभेच्या समाप्तीनंतर होणाया पसायदानास त्या परत येणार आहेत तर त्यांचेही आभार. कारण सभा संपल्यानंतर त्यांचे आभार मानता येत नाहीत म्हणून आधीच मानतो. तसेच सभेची तयारी सर्व सभासदांना सभेची नोटीस देणारा सर्व आपला शारदा सभागृहातील स्टाफ, कॉलेज मधील स्टाफ या सर्वांचे आभार मानतो आणि ॲडमिन बोर्डाचेही मी आभार मानतो. शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रयत्नांनीच आपला हा कार्यक्रम जो जनरल बॉडीचा नाही, परंतु शालेय आणि कॉलेज शिक्षणाचा जो कार्यक्रम आहे या लोकांच्यामुळेच पुढे जात आहे आणि त्यांच्या

मार्गदर्शनाखाली नियामक मंडळ त्यात सुधारणा करत असते. कारण आम्ही काही शिक्षण क्षेत्रातली माननीय व्यक्ती काही नाही. त्यामुळे आम्हाला आम्ही आमचे व्यवसाय आणि प्रोफेशन संभाळूनच या गोष्टी करायला लागतात. परंतु या सर्व ॲडमिन बोर्डच्या ॲडमिन बोर्ड हे सर्व कॉलेज आणि शाळेचे मुख्याध्यापकांचे बनलेले असत. त्यामुळे त्यांच्या सूचना आम्हाला फार मोलाच्या असतात. तर या सर्वांचे आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवतो. धन्यवाद!

डॉ. राधिका इनामदार : सभेच्या शेवटच्या टप्प्यामध्ये आपण आलेलो आहोत आणि सरांनी सांगितलं तसं पसायदानाने आपल्या या सभेची सांगता होणार आहे. तत्पूर्वी आपलं सरस्वती स्तवन आणि पसायदान जिने म्हटलं त्या प्रार्थना मॅडमचा आपण चितळे सरांच्या हस्ते सत्कार करू या. त्यांना मी रंगमंचावर आमंत्रित करते. एक सूचना आहे, नम्र विनंती आहे की जर कोणाची नोंदणी करायची राहिली असेल. बाहेर प्रवेशद्वाराजवळ आपण व्यवस्था केलेली आहे तर कोणाची चुकून नोंदणी करायची राहिली असेल तर त्यांनी ती नंतर करावी ही विनंती. आणि तसेच चितळे सर आपली सर्वतोपरी काळजी घेत असतात, त्यांनी आता मला आठवणीत येऊन सांगितलं की अल्पोपहाराची सूचनाही द्या. तर सभेनंतर आपल्या सर्वांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था केलेली आहे. कुणीही कृपया अल्पोपहार न घेता जाऊ नका. उपवासाची देखील डिश ठेवलेली आहे. त्यामुळे आमचा उपवास आहे म्हणून आम्ही अल्पोपहार घेऊ शकलो नाही असं म्हणू नका. उपवासाची देखील व्यवस्था केलेली आहे. आता आपण आपल्या सभेची सांगता करत आहोत. तर मी परत एकदा प्रार्थना मॅडमना बोलवते त्यांनी पसायदाननी आपल्या सभेची सांगता करावी.

यानंतर पसायदान होऊन सभा समाप्त झाली.

Audited Financial Statements

Of

Shikshana Prasaraka Mandali, Pune

Sharda Sabhagriha,
S.P. College Campus,
Pune: 411 030

For

Financial Year Ended On 31st March, 2026

Auditors

M/s. D R B S V & Associates
Chartered Accountants

"Yash" Bungalow,
3rd Floor,
K-6/3, Erandwane Co-operative Society,
Opposite Sevasadan School,
Near Deenanath Mangeshkar Hospital,
Erandwane,
Pune- 411 004.

Independent Auditor's Report

To,

Shikshana Prasaraka Mandali,
Pune

Opinion

We have audited the accompanying financial statements of your trust which comprise the Balance Sheet as at 31 March 2026, the Income and Expenditure Account and the Receipts and Payments Account for the year then ended, together with the schedules, significant accounting policies and notes to accounts.

In our opinion and according to the information and explanations given to us, the aforesaid financial statements give a true and fair view of the state of affairs of your trust as at 31 March 2026 and its surplus and receipts and payments for the year then ended in accordance with the accounting principles generally accepted in India, provisions of the Maharashtra Public Trusts Act, 1950 and the Maharashtra Public Trusts Rules.

Basis for Opinion

We conducted our audit in accordance with the Standards on Auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Our responsibilities under those Standards are further described in Auditor's Responsibilities for the audit of the Financial Statements section of our report. We are independent of the Trust in accordance with the Code of Ethics issued by the Institute of Chartered Accountants of India together with ethical requirements that are relevant to our audit of the financial statements and have fulfilled our other ethical responsibilities in accordance with these requirements and Code of Ethics. We believe that the audit evidence obtained by us is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

Responsibilities of Managing Trustees

The Managing Trustees are responsible for preparation of these financial statements that give a true and fair view of the financial position, financial performance of the trust in accordance with the accounting principles generally accepted in India. This responsibility also includes maintenance of adequate accounting records in accordance with the provisions of the Act for safeguarding the assets of the trust and for preventing and detecting frauds and other irregularities; selection and application of appropriate accounting policies; making judgments and estimates that are reasonable and prudent; and design, implementation and maintenance of adequate internal financial controls, that were operating effectively for ensuring the accuracy and completeness of the accounting records, relevant to the preparation and presentation of the financial statements that give a true and fair view and are free from material misstatement, whether due to fraud or error.

The managing trustees are also responsible for overseeing the trust's financial reporting process.

Auditor's Responsibilities

Our objectives are to obtain reasonable assurance about whether the financial statements as a whole are free from material misstatement, whether due to fraud or error, and to issue an auditor's report that includes our opinion. Reasonable assurance is a high level of assurance, but is not a guarantee that an audit conducted in accordance with SAs will always detect a material misstatement when it exists. Misstatements can arise from fraud or error and are considered material if, individually or in the aggregate, they could reasonably be expected to influence the economic decisions of users taken on the basis of these financial statements.

As part of an audit in accordance with SAs, we exercise professional judgment and maintain professional skepticism throughout the audit. We also:

- Identify and assess the risks of material misstatement of the Financial Statements, whether due to fraud or error, design and perform audit procedures responsive to those risks, and obtain audit evidence that is sufficient and appropriate to provide a basis for our opinion. The risk of not detecting a material misstatement resulting from fraud is higher than for one resulting from error, as fraud may involve collusion, forgery, intentional omissions, misrepresentations, or the override of internal control.

- Obtain an understanding of internal financial control relevant to the audit in order to design audit procedures that are appropriate in the circumstances.

- Evaluate the appropriateness of accounting policies used and the reasonableness of accounting estimates and related disclosures made by the trustees.

- Evaluate the overall presentation, structure and content of the Financial Statements, including the disclosures, and whether the Financial Statements represent the underlying transactions and events in a manner that achieves fair presentation.

Materiality is the magnitude of misstatements in the Financial Statements that, individually or in aggregate, makes it probable that the economic decisions of a reasonably knowledgeable user of the Financial Statements may be influenced. We consider quantitative materiality and qualitative factors in (i) planning the scope of our audit work and in evaluating the results of our work; and (ii) to evaluate the effect of any identified misstatements in the Financial Statements.

We communicate with managing trustees regarding, among other matters, the planned scope and timing of the audit and significant audit findings, including any significant deficiencies in internal financial controls that we identify during our audit.

We also provide managing trustees with a statement that we have complied with relevant ethical requirements regarding independence, and to communicate with them all relationships

and other matters that may reasonably be thought to bear on our independence, and where applicable, related safeguards.

Report on Other Legal and Regulatory Requirements

We report that:

1. We have obtained all the information and explanations which to the best of our knowledge and belief were necessary for our audit.
2. Proper books of account have been maintained by the Trust.
3. The Balance Sheet, Income & Expenditure Account and Receipts & Payments Account agree with the books of account.
4. The prescribed particulars have been furnished separately and form an integral part of this report.

Further we report as under:

a. The accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and Rules.

b. The receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts.

c. The cash balance and vouchers in the custody of the secretary & Heads of respective Institutes as on the date of audit were in agreement with the books of account.

d. All books, deeds, accounts, vouchers, other documents, or records required by us, were produced before us for our verification.

e. The trust is in the process of updating register of movable & immovable properties in the prescribed format. The items mentioned therein need to be tallied with the assets physically available at various locations employing bar code technology to enable better control over physical verification and impairment of fixed assets.

f. The secretary & Heads of respective Institutes and other persons appeared before us and furnished the necessary information required by us for the purpose of audit.

g. The property or funds of the trust were not applied for any object or purpose other than the objects or purposes of the trust.

h. The amount receivable and outstanding for a period of more than one year is **Rs. 15.13 Crores.**

(Refer note 3(iii) of Schedule 17 of Notes to Accounts)

The amount written off during the year is **Rs. 1.31 Crores.**

(Refer note 3(iv) of Schedule 17 of Notes to Accounts)

i. The tenders/quotations were invited wherever applicable.

j. No any money of the public trust has been invested contrary to the provisions of Section-35.

k. As per the information and explanations given to us, there are no any cases of alienations of the immovable property contrary to the provisions of section 36 which have come to our notice.

l. According to the information and explanations given to us, there were no any case/s of irregular, illegal or improper expenditure or failure or omission to recover monies or other property belonging to the public trust or of loss or wastage of money or other property of the trust.

(Refer note 3(vii) of Schedule 17 - Notes to Accounts)

m. The budget has been filed in the form provided by Rule-16A.

n. The maximum and minimum number of trustees is maintained during the year.

o. The meetings are held regularly as provided in the Trust Deed.

p. The Trust has maintained the Minutes Book of the proceedings of the meeting of the trustees.

q. As per the information and explanations given to us, no trustees have any interest in the investment of the Trust.

r. As informed to us, no trustee is a debtor or creditor of the Trust.

s. The irregularities pointed out by us in previous year's audit report are in the process of being complied with.

t. There is no any special matter which we think fit or necessary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner.

For D R B S V & Associates
Chartered Accountants
Firm Registration No.: 122260W



CA Shireesh N. Agte
(Partner)
Membership No. 044641
UDIN: 26044641DGVJVF4721

Place: Pune
Date: 29-08-2026

The Maharashtra Public Trust Act,1950 Registration No F/86/21.11.1952/Pune
Schedule VIII [Vide Rule 17(1)]
Shikshana Prasaraka Mandali, Pune 411 030

Balance Sheet as at 31st March 2026 (Amount in Rs.)

